| अ.क्र. | लक्षवेधी सूचना | विभाग |
|---|---|---|
| १ | मुंबईतील अरबी समुद्रात जागतिक दर्जाच्या भव्य शिवस्मारकाचे मा.पंतप्रधान यांच्या हस्ते भुमीपुजन करण्यात येणे, अरबी समुद्रातील शिवस्मारकाला मच्छिमार बांधवांनी विरोध दर्शविला असणे, स्मारकाच्या आराखडयाचे काम मार्गी लावल्याचा राज्य सरकारने गाजावाजा केला असला तरी प्रत्यक्षात सदरील प्रकल्प रखडल्याने किती दिवसात पुर्ण करण्यात येणार आहे याबाबत जनमानसात प्रश्न असणे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाचे भूमीपुजन इंदू मिलमध्ये दोन वर्षापूर्वी झाले पण प्रत्यक्षात तिथे कसलेही काम सुरु झाले नसल्याने शिवाजी महाराजांचे स्मारक होता होईल की नाही अशी महाराष्ट्र जनतेच्या मनात भावना निर्माण होणे, शिवस्मारकाच्या महत्वाकांक्षी प्रकल्पासाठी ३६०० कोटी रुपये खर्चाची तरतूदी शासनाकडून कोणती स्पष्टता व्यक्त करण्यात न येणे, जनमानसात शिवस्मारक उभारण्याबाबत साक्षंकता व्यक्त होत असल्याने शिवस्मारक उभारण्याबाबत शासनस्तरावरुन तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रीया. | **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून)** |
| २ | मुंबई-गोवा महामार्गाची ऐन पावसाळयात चाळण झाली असून येथील प्रवाशांना जीव मुठीत धरुन प्रवास करावा लागत असल्याचे माहे जुलै, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास येणे, सन २०१० च्या अखेरीस सुरु झालेल्या या महामार्गाचे चौपदरीकरणाचे काम ६ वर्षे उलटूनही अद्याप पूर्ण झाले नसणे, ६ वर्षात २ ठेकेदार बदलून गेले असतानाही या महामार्गाच्या कामाला गती न येणे, या रस्त्यांना अनेक खड्डे पडून त्यातील खडी, रेती बाहेर येवून ती रस्त्यावर सर्वत्र पसरली असणे या महामार्गावरील पनवेल-नागोठणे हा रस्ता म्हणजे मृत्युचा सापळा बनला असणे, पळस्पे, शीरडोण या गावांच्या हद्दीत महामार्गावरील दोन्ही बाजूला मोठ-मोठे कंटेनर आणि ट्रान्सपोर्टच्या गाडया पार्क केल्या असणे, या सर्व बाबींमुळे अपघातांचे प्रमाण येथे वाढलेले असतानाही शासन याकडे करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी या महामार्गावर प्रवास करताना जनतेमध्ये पसरलेले तीव्र असंतोषाचे वातावरण यामुळे शासनाने या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करुन या महामार्गाच्या कामाला गती देण्याबाबत करावयाची तातडीची दुरुस्ती व शासनाची प्रतिक्रिया. | **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून)** |
| ३ | मुंबईत पावसाच्या आगमनाबरोबर साथीच्या आजारांचा फैलाव झाला असून जानेवारी, २०१७ ते मे, २०१७ महिन्यापर्यंत स्वाईन फ्ल्यू, मलेरिया, लेप्टो व डेंग्यूची रुग्णसंख्या वाढणे, सध्या मुंबईत सर्वाधिक ८८६ गॅस्ट्रोच्या रुग्णांची नोंद होणे, याशिवाय मलेरियाचे ४४२ आणि काविळीचे ९८ रूग्ण आढळून येणे जून, २०१७ च्या शेवटच्या आठवडयापर्यंत लेप्टोची रुग्ण संख्या २० पर्यंत पोहचणे, एडिस इजिप्ती या डासांमुळे पसरणाऱ्या डेंग्युसदृष्य रुग्णसंख्या जून महिन्याच्या शेवटच्या आठवडयापर्यंत २४९ पोहचून ३१ रुग्णांना डेंग्यूची लागण होणे, सदर आजारांची रुग्ण संख्या दिवसेंदिवस वाढत असतानाही याकडे शासन करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी येथील जनतेत पसरलेले तीव्र असंतोषाचे वातावरण यामुळे शासनाने या आजारांना आळा घालण्याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. | **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण** |
| ४ | मुंबई अंमली पदार्थांच्या विळख्यात अडकलेली असून स्वस्तात मिळणाऱ्या आणि जास्त नशा आणणाऱ्या नवीन झोलटाईम या धोकादायक अंमली पदार्थांची तस्करी सद्या मुंबईत मोठया प्रमाणात होत असल्याचे उघड होणे, अंमली ड्रग्ज पाठोपाठ आता तस्करांच्या माध्यमातून केटामाईन, इन्फेटामाईन, इफेड्रीन, कोशिगा, बीगा, ट्रौमा इत्यादी इंमली पदार्थ नशेबाजांना पुरविले जाणे, तसेच झोलटाईम चे सेवन पाटर्यांमध्ये मोठया प्रमाणात होत असून या तस्करी प्रकरणी दिनांक ९ जुलै, २०१७ रोजी वा त्या दरम्यान माहीममधून केंद्रीय अंमली पदार्थ विरोधी पथकाने एकाला अटक करणे, एमडी या अमली पदार्थाची अतिशय मोठया प्रमाणात तस्करी होणे, अभिनेत्री कृतिका चौधरी हीची हत्या एमडी या अंमली पदार्थाच्या वादातून पेशाच्या देवाण घेवाण होणे, मुंबईमध्ये अंमली पदार्थांचे सेवन व खरेदी विक्रीची प्रकरणे उघडकीस येत असताना मुंबईतील पोलीस विभाग याकडे करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत राज्य | **गृह** |

| | | |
|---|---|---|
| | शासनाने तातडीने चौकशी करुन मुंबईतील अंमली पदार्थांची होत असलेली तस्करी रोखण्यासाठी करावयाची तातडीची कारवाई व याबाबत शासनाची प्रतिक्रिया. | |
| ५ | नागपूर येथील कळमेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्यीतील वेणा जलाशयात नागपूरमधील ११ विद्यार्थ्यांना घेऊन जाणारी बोट उलटून त्यातील सात विद्यार्थी मृत्यूमुखी पडल्याची घटना दिनांक ९ जुलै, २०१७ रोजी वा त्या सुमारास उघड होणे, त्यामुळे राज्यातील जलवाहतूक करणाऱ्या सर्वसामान्य जनतेत पसरलेले तीव्र संतापाची लाट, याबाबत राज्य शासनाने जलवाहतुकीचे कडक नियम आखून देऊन त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यासाठी तेथील सुरक्षा यंत्रणा सुसज्ज करण्यासाठी करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया. | **गृह** |
| ६ | हजारो गुंतवणूकदारांना कोट्यावधींचा गंडा घालणाऱ्या ठाणे जिल्ह्यातील बदलापूरच्या सागर इन्व्हेस्टमेंट फसवणूक प्रकरणाच्या चौकशीत काही ठोस समोर येत नसल्याने नैराश्य आलेल्या सुदर्शन परांजपे या गुंतवणूकदाराचा दिनांक ११ जुलै, २०१७ रोजी मृत्यु होणे, श्री. परांजपे यांनी आयुष्याची कमाई सागर इन्व्हेस्टमेंट मध्ये गुंतवली मात्र कंपनी बुडाल्याने त्यांना नैराश्य येणे, सागर इन्व्हेस्टमेंटच्या फसवणुकीमुळे अनेक जेष्ठ नागरिक अंथरुणाला खिळले असून औषधे घेण्या इतकेही पैसे नसल्याने त्यांचे हाल सुरु असून या फसवणुकीच्या प्रकरणाच्या चौकशीत कोणतीच ठोस कारवाई होत नसल्याने गुंतवणूकदारांमध्ये निर्माण झालेली संतापाची व असंतोषाची भावना, याबाबत शासनाने सखोल चौकशी करुन सदर कंपनीतील संबंधीतावर कारवाई करुन फसवणूक झालेल्या गुंतवणूकदारांची रक्कम परत मिळावी यासाठी कार्यवाही करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया. | **गृह** |
| ७ | ठाणे जिल्ह्यातील भिवंडी शहरातील ग्रामीण भागात असलेल्या शेकडो गोदामामध्ये बेकायदेशीर रासायनिक द्रव्याची मोठया प्रमाणात साठवणूक केली जात असल्याने येथील नागरीकांच्या जीवाला धोका निर्माण झाला असल्याचे माहे जुलै, २०१७ दरम्यान निदर्शनास येणे या गोदामात रासायनिक द्रव्यांची साठवणूक करताना सुरक्षिततेची योग्य काळजी घेतली जात नसणे, यामुळे गोदामांना वारंवार आगी लागण्याच्या घटना घडत असणे, गेल्या वर्षभराचा विचार केल्यास भिवंडीच्या गोदाम पट्टयात रासायनिक द्रव्याचा साठा व अन्य साधन सामुग्रीच्या सुमारे ७१८ गोदामांना आगी लागलेल्या असतानाही शासन याकडे करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी येथील जनतेत निर्माण झालेले तीव्र असंतोषाचे वातावरण म्हणून शासनाने या गोदामांवर तत्काळ कारवाई करुन येथील रासायनिक गोदामे बंद करण्याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. | **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण** |
| ८ | मौजे डेरवण (ता. डेरवण, जि. रत्नागिरी) येथील बी.के.एल वालावलकर ग्रामीण वैद्यकिय महाविद्यालयाची फी ४,००,००९ रुपयावरुन ७,२५,००० रुपये वाढवणे, या अवास्तव फी वाढी विरोधात पालकांनी माननीय वैद्यकिय शिक्षण मंत्री आणि शुल्क नियमन प्राधिकरण यांच्याकडे तक्रारी करणे, मेडिकल कौन्सिल ऑफ इंडियाच्या मानांकाप्रमाणे १३७ पूर्ण वेळ शिक्षकांची या कॉलेजमध्ये आवश्यकता असणे, परंतु सदर कॉलेजने फी वाढीसाठी दिलेल्या प्रस्तावात २५५ पूर्ण वेळ शिक्षक असल्याचे दाखविले असणे, परंतु वास्तवात फक्त ४१ शिक्षक कायम स्वरुपात असणे, ५६ शिक्षक हे फक्त कॉलेजच्या मेडिकल कौन्सिल ऑफ इंडियाच्या इन्स्पेक्शनच्या दिवशीच हजर राहत असणे, या प्रत्येकाला चार ते पाच लाख रुपये देण्यात येणे, हे सर्व शिक्षक कॉलेजपासून दूर राहत असणे, फि वाढीसाठी अशी असत्य माहिती कॉलेजने देणे, याचा सर्व तपशील शिक्षण व्यापारीकरण विरोधी मंचाने सन्माननीय मुख्यमंत्र्यांना दिनांक ११ जुलै २०१७ रोजी दिलेला असणे, या आरोपांची चौकशी महाराष्ट्र सी.आय.डी मार्फत करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया. | **वैद्यकीय शिक्षण** |

| | | |
|---|---|---|
| ९ | पुणे शहरात कच-याचा गंभीर झालेला प्रश्न, पुणे शहरातील कचरा टाकण्यास ऊरुळी देवाची आणि फुरसुंगी गावातील ग्रामस्थांचा असलेला तीव्र विरोध, हा प्रश्न सुटावा यासाठी माहे एप्रिल-मे, २०१७ च्या सुमारास ग्रामस्थांनी/नागरीकांनी सुमारे २३ दिवस केलेले आंदोलन, यावर उपाययोजना करता यावी यासाठी दिनांक ७ मे, २०१७ रोजी अथवा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांनी संबंधित ग्रामस्थ/नागरीक, लोकप्रतिनिधी आणि पुणे महानगरपालिकेचे पदाधिकारी/अधिकारी यांची आयोजिलेली संयुक्त बैठक, सदर बैठकीत पुणे शहराच्या कचरा प्रश्नांबाबत एका महिन्यात सर्वंकष आराखडा करण्याचा आणि ऊरुळी देवाची, तसेच फुरसुंगी गावातील प्रकल्पग्रस्तांना महानगरपालिकेच्या सेवेत विशेष बाब म्हणून कायमस्वरुपी सामावून घेण्याचा घेण्यात आलेला निर्णय, मात्र त्यानुसार पुढील कार्यवाही करण्याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, सदर बैठकीतील निर्णयानुसार कार्यवाही होत नसल्यामुळे ग्रामस्थांमध्ये निर्माण झालेली संतापाची भावना, तातडीने कार्यवाही न झाल्यास त्यांनी पुन्हा आंदोलन करण्याचा घेतलेला निर्णय, तसे झाल्यास पुणे शहरातील कच-याचा पुन्हा निर्माण होणारा गंभीर प्रश्न, यात शासनाने त्वरीत लक्ष घालून बैठकीतील निर्णयानुसार कार्यवाही करण्याची आवश्यकता, यावर शासनाची प्रतिक्रिया व करावयाची कार्यवाही. | **नगर विकास** |
| १० | लोकसंख्येच्या आधारावर राज्यातील १८ जिल्हयांचे विभाजन करुन नवीन २२ जिल्हे निर्मितीचा प्रस्ताव राज्यशासनापुढे ऑगस्ट, २०१५ मध्ये येणे, यावर निर्णय घेण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली अर्थ, महसूल, नियोजन विभगाचे सचिव आणि विभागाय आयुक्तासह राजकिय पक्षांच्या नेत्यांचा समावेश असलेली समिती गठीत करण्यात येणे, या समितीचा अहवाल चार महिन्यात येणे अपेक्षित असतांना राज्यशासनाने गेल्या दीड वर्षापासून तो प्राप्त झाला नसल्याचे माहे जुन, २०१७ च्यासुमारास उजेडात येणे, विदर्भातील बुलढाणा, यवतमाळ, अमरावती, चंद्रपूर व गडचिरोलीसह राज्यातील एकूण १८ जिल्हयांच्या विभाजनाचा प्रस्ताव असणे, राज्यात १९८८ नंतर १० जिल्हयांची निर्मिती करण्यात येणे सध्या ३६ जिल्हे ३५५ तालुके असणे मात्र सध्या अस्तित्वात असलेले जिल्हे काही तालुक्यांची ठिकाणे भौगोलिकदृष्टया गैरसोयीचे असल्याने जनतेच्या मागणीनुसार जिल्हा, तालुका निर्मितीची मागणी करण्यात येणे, राज्यात २२ जिल्हे निर्मिती करण्याचा प्रस्ताव समितीच्या अहवालात अडकली असल्याने राज्यातील नविन २२ जिल्हयांची निर्मिती अडकली असल्याने जनमानसात तीव्र असंतोष निर्माण होणे, राज्यशासनाने नविन २२ जिल्हयांची निर्मितीबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रिया. | **महसूल** |
| ११ | मुंबई विद्यापीठाच्या २०१७ या शैक्षणिक वर्षात घेतलेल्या सुमारे ४७७ परिक्षांच्या २२ लाख उत्त्रपत्रिकांची तपासणी ऑनलाईन करण्याचा दिनांक २८ एप्रिल,२०१७ रोजी घेतलेला निर्णय, त्यानुसार "मेरिट ट्रॅक" या कंपनीची निवड करुन त्यांचेकडे सदर उत्तरपत्रिका तपासणीचे सोपविलेले काम, त्यास दोन महिन्यांपेक्षा जास्त कालावधी लोटल्यानंतरही पदवी परिक्षांचे निकाल जाहिर झालेले नसणे, महाराष्ट्र विद्यापीठ कायद्यानुसार परिक्षांचे निकाल परिक्षा झाल्यापासून ४५ दिवसांच्या आत जाहिर करणे बंधनकारक असणे, मात्र ४५ दिवस उलटल्यानंतरही ४७७ परिक्षांपैकी तब्बल ४२६ परिक्षाचे निकाल जाहिर करणे बाकी असणे, यात कला विज्ञान व वाणिज्य शाखांच्या तृतीय वर्षांचे तसेच विधी अशा सर्वच महत्त्वाच्या परिक्षांच्या निकालांचा असलेला समावेश, वेळेवर निकाल न लागल्याने अनेकांच्या पुढील अभ्यासक्रमांच्या प्रवेशाचे वेळापत्रक कोलमडलेले असणे, परिणामी त्यांच्या आयुष्यातील एक महत्त्वाचे वर्ष वाया जाण्याची निर्माण झालेली शक्यता, परिणामी विद्यार्थी व पालकांमध्ये निर्माण झालेले चिंतेचे व असंतोषाचे वातावरण, परिक्षा घेणे हे विद्यापीठांचे महत्त्वाचे काम असणे, त्यात हेळसांड म्हणजे गुणवत्तेशी प्रतारणा असणे, मुंबई विद्यापीठ याबाबत गंभीर नसल्याचे दिसून येत असणे, या गंभीर प्रकरणाचा आढावा घेण्यासाठी मा. राज्यपाल महोदयांनी मुंबई विद्यापीठाचे कुलपती या नात्याने दिनांक ४ जुलै, २०१७ रोजीच्या दरम्यान विद्यापीठाचे | **उच्च व तंत्र शिक्षण** |

| | | |
|---|---|---|
| | कुलगुरु, परिक्षा नियंत्रक इत्यादींची बैठक आयोजित करुन या संदर्भात त्वरीत कार्यवाही करण्याचे दिलेले आदेश, हा गंभीर प्रकार घडलेला असताना शासनाचे त्याकडे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, यावर शासनाची प्रतिक्रिया व तातडीने करावयाची कार्यवाही. | |
| १२ | राज्यातील शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी व्हावी व त्यांचा सात-बारा कोरा व्हावा यासाठी राज्यातील शेतक-यांनी दिनांक १ जून, २०१७ ते दिनांक ११ जून, २०१७ च्या सुमारापर्यंत राज्यात बंद पुकारुन केलेले राज्यव्यापी आंदोलन, तसेच राजकीय पक्षांनी या मागणीसाठी केलेले राज्यव्यापी आंदोलन, त्यात लोकप्रतिनिधींचा असलेला समावेश, त्यानंतर दिनांक ३ जून, ११ जून, २४ जून, २०१७ रोजीच्या सुमारास कर्जमाफी संदर्भात घेतलेले निर्णय, त्यानंतर दिनांक ५ जुलै, २०१७ रोजीच्या सुमारास शासनाने कर्जमाफीसाठीची छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना राबविण्याचा घेतलेला निर्णय, मात्र या चारही निर्णयात सुसूत्रता नसून त्यात आलेली विसंगती, कर्जमाफीसाठी कठोर व व्यापक निकष, अटी, शर्थी घालण्यात आलेल्या असणे, सरकारची आकडेवारी व अन्य मुद्यांबाबत गोंधळाची निर्माण झालेली स्थिती, सात-बारा कसा कोरा होणार, नवीन कर्ज कधी मिळणार याबाबत शासनाने केलेल्या घोषणा व त्याबाबत निर्गमित करण्यात आलेले आदेश यात मोठयाप्रमाणात असलेली तफावत, शासनाच्या दाव्यानुसार कर्जमाफीचा फायदा ८९ लाख शेतक-यांना होणार असून ४० लाख शेतक-यांचा सात-बारा कोरा होणार असणे, केंद्र सरकारने कृषी तज्ञ डॉ.एम.एस.स्वामीनाथन यांच्या आयोगाने केलेल्या शिफारशीची अंमलबजावणी करण्यात शासनाकडून होत असलेली टाळाटाळ, शासनाने ९० लाख शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करण्यासाठी ३४ हजार कोटी रुपयाची केलेली तरतूद विचारात घेता ती अगदीच तुटपुंजी असणे, खरीप हंगामासाठी दहा हजार रुपये तातडीने देण्याचा शासनाचा नियोजना अभावी काढलेला निर्णयाला जोवर कर्जमाफी होत नाही किंवा कर्जाचे पुनर्गठन होत नाही तोवर शेतक-यांना कर्ज द्यावचे असे राष्ट्रीयीकृत बँका, जिल्हा बँक व व्यापारी बँकांनी शेतक-यांना कर्ज देण्यास असमर्थता दाखविणे, कर्जमाफी करतांना व्यक्ती हा निकष न लावता कुटुंब हा निकष लावल्याने प्रत्यक्षात कमी शेतकऱ्यांनाच याचा लाभ मिळणार असणे, कर्जमाफीतून वर्ग ३ च्या कर्मचाऱ्यांना वगळण्याबाबत सातत्याने मागणी करुनही त्याचा समावेश न केल्याने सैन्य दलात देशासाठी लढणाऱ्या राज्यातील वर्ग ३ च्या दोन ते अडीच लाख सैनिकांनाही या योजनेचा लाभ मिळणार नसणे, मात्र प्रत्यक्षात ८९ लाख नव्हे तर १५ लाख शेतक-यांची कर्जमाफी होणार असल्याचे विविध पुराव्यांवरुन स्पष्ट होत असणे, सरसकट कर्जमाफीची मागणी असताना अनेक शेतक-यांना कर्जमाफीतून वगळलेले असणे, शासनाचे सदरचे आदेश दिशाभूल करणारे व शेतक-यांची फसवणूक करणारे असल्याचे दिसून येत असणे, त्यामुळे तत्त्वत: अटी, शर्ती, निकष इत्यादी शब्दजंजाळात शेतक-यांना न फसविता राज्यात सरसकट कर्जमाफी देण्याचा सुधारीत निर्णय घेण्याची आवश्यकता, शासनाने घोषणा केल्याप्रमाणे शेतक-यांनी घेतलेले पीक कर्ज आणि कृषीपूरक कर्ज सरसकट माफ करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व करावयाची कार्यवाही. | **सहकार** |
| १३ | राज्यशासनाद्वारे राबविण्यात येणा-या मुंबई-नागपूर ७१० कि.मी. समृध्दी महामार्गासाठी शेतक-यांच्या शेतजमीन, फळबागायती अधिग्रहण येणार असून उक्त समृध्दी महामार्गासाठी बागायती, फळबागायती जमिनी देण्यास होणारा शेतक-यांचा प्रंचड विरोध मोडून काढण्यासाठी राज्यशासन पोलीस बळाचा वापर करीत असणे, कल्याण तालुक्यातील फळेगाव येथे समृध्दी महामार्गासाठी विरोध करणा-या १६ शेतकऱ्यांवर गुन्हे दाखल करणे, राज्यात ठाणे, नाशिक, अहमदनगर, औरंगाबाद सह १० जिल्हयातील ५० पेक्षा अधिक गावांमधून समृध्दी महामार्गासाठी शेतक-यांकडून होत असलेला विरोध लक्षात घेता या मार्गाबाबत राज्य शासनाने दडपशाहीने जमिनी घेणार नाही अशी आपली भुमिका जाहिर केलेली असतना ती भुमिका डावलून शेतक-यांच्या जमिनी दडपशाहीने ताब्यात घेण्याचा प्रकार सुरु असणे, मुंबई-नागपूर या समृध्दी हायवेत २७ गावांतील हजारो हेक्टर जमीन लॅण्ड पुलिंग अंतर्गत संपादित केला जाणार असणे, समृध्दी हायवेला शहापूर तालुक्यातील शेतक-यांनी तीव्र विरोध केला असून या विरोधात स्थापन झालेल्या संघर्ष समितीवर वनखात्याची | **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून)** |

| | | |
|---|---|---|
| | जमीन मोजणीच्या कामात मज्जाव केल्याप्रकरणी पोलिसांनी या संघर्ष समितीवर गुन्हा दाखल करण्यात येणे, समृध्दी हायवेत शेतक-यांचा विरोध लक्षात घेता संघर्ष समितीबरोबर मा.मुख्यमंत्री सोबत झालेल्या बैठकीत शेतक-यांना विश्वासात घेऊनच या हायवेची निर्मिती केली जाणार असल्याचे महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळाच्या अधिका-यांना सूचना करुनही या सुचनेला संबंधित अधिकारी बगल देत असणे, मुंबई-नागपूर या समृध्दी हायवे प्रकरणातील पोलिस बळाचा वापर करुन शेतक-यांवर केलेल्या खोट्या गुन्हे दाखल करीत असणे, मुंबई-नागपूर समृध्दी महामार्गासाठी एकूण किती जमिनींचे भूसंपादन करण्यात येणार आहेत, त्यामुळे किती गावकरी/शेतकरी बाधित होणर आहेत व त्यांना कशाप्रकारे मोबदला देण्यात येणार आहे व त्यांचे कशाप्रकारे पुनर्वसन करण्यात येणार आहे याबाबत राज्यशासनाची भुमिका स्पष्ट न होणे, त्यामुळे शेतक-यांमध्ये शासनाबाबत तीव्र असंतोष व चिडीची भावना निर्माण होणे, मुंबई-नागपूर या समृध्दी महामार्गाच्या प्रकल्पामध्ये शेतकऱ्यांवर होत असलेल्या अन्यायबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रीया. | |
| **१४** | नांदेड जिल्हयात तालुका उमरी मौजे कारला येथे सोमवार दिनांक १२ जून, २०१७ रोजी तर जालना जिल्हयात तालुका घनसावली मौज खडकवाडी येथे दोन अशा एकुण ७ महिला आणि वर्धा जिल्हयात तीन पुरुषाचा वीज पडुन मृत्यु होणे, राज्यात मान्सुन पुर्व वलिव पाऊसात आणि मान्सुन पावसात वीज पडुन अनेकांचा मृत्यु होणे. वीज पडुन मृत्यु होऊ नये याकरिता संरक्षण कसे करावे यांची माहिती नसणे अशी माहिती ग्रामिण भागातील कानाकोपऱ्यातील गावकऱ्यांना देणे आवश्यक असणे, अशी माहिती देऊन पडणाऱ्या विजेपासुन संरक्षण कसे करावयाचे यासाठी ठराविक काळाने पुन्हापुन्हा गावकऱ्यांना जागृत करण्याचे कर्तव्य शासन करित नसेणे, शाळा कॉलेजमधील विद्यार्थ्यांना संरक्षणा साठी काय करावयाचे यांची माहिती देऊन त्यांच्या पालकाना जागृत करण्याला प्रेरित करण्याची आवश्यकता स्थानिक स्वरांज्य संस्थाचे सदस्य तसेच कर्मचारी यांनी संरक्षणाचा संदेश प्रत्येक नागरिकांपर्यत पोहचविण्याचे आवश्यकता वीज पडुन मोठया प्रमाणात मृत्यु होणाऱ्या लोंकाना वाचविण्याची आवश्यकता वीज पडुन मृत्यु होण्याच्या भिंतीमुळे नागरिकांच्या मध्ये विशेषत: ग्रामिण जनतेमध्ये वाढलेली चिंता आणि निर्माण झालेला असंतोष शासनाने करावयाची कार्यवाही आणि योजना आणि प्रतिक्रिया. | **पर्यावरण** |
| **१५** | मुंबई जवळच कल्याण येथील नेवाळी विमानतळासाठी सरकारने जबरदस्तीने जमिनी संपादित केल्याच्या विरोधात नाका परिसरकार शेतक-यांनी उग्र आंदोलन करुन सरकारने जबरदस्तीने नेवाळी विमानतळासाठी जमिनी संपादित केल्याच्या विरोधात शेतक-यांनी डोंबिवली-बदलापूर पाईपलाईन मार्गावरील वाहतूक रोखून पोलिसांची वाहने पेटवून, पोलिसांनी केलेल्या गोळीबारात ११ आंदोलक व ५ पोलीस जखमी झाल्याची दि.२१.६.२०१७ रोजी घटना घडणे, कल्याण येथील नेवाळीजवळील विमानतळाच्या जागेचा प्रश्न चिघळला असणे, दुस-या महायुध्दाच्या वेळी सैनिकांना ने-आण करण्यासाठी आणि मालवाहू विमाने उतरवण्यासाठी ब्रिटीशांनी नेवाळी येथे विमानतळ सुरु केले होते. या विमानतळासाठी ब्रिटीशांनी त्यावेळी शेतक-यांकडून जमिनी संपादित केल्या होत्या परंतू काही वर्षांनी त्या जमिनी शेतक-यांच्या ताब्यात आल्या होत्या परंतू या जमिनी नौदलाकडे हस्तांतरीत करण्यात आल्याचे गेल्या वर्षी जिल्हाधिका-यांनी सदरील जमिनी नौदलाने ताब्यात घेण्यास सुरुवात करणे, आपल्याच मालकीच्या शेतजमिनींवर पेरणी करण्यास मज्जाव केल्याने शेतकरी संतप्त होणे, त्यामुळे शेतक-यांनी उग्र रुप धारण करुन पोलीसांच्या गाडया पेटवून, रस्ता रोखून, आंदोलन केल्याने या परिसरातील कायदा व सुव्यवस्था बिघडणे, राज्यशासनाने याप्रकरणी तातडीने कार्यवाही करुन नेवाळी विमानतळातील शेतक-यांचा प्रश्न तातडीने सोडविण्याबाबत करावयाची कार्यवाही व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रिया. | **महसूल** |
| **१६** | मुंबई शहरातील विक्रोळी हनुमान नगर येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनाअंतर्गत (एसआरए) प्रकल्पात मोठयाप्रमाणात गैरव्यवहार झाल्याची माहिती सामाजिक माहिती अधिकार कार्यकर्तेकडून उघड होणे, प्रकल्प उभारण्याऱ्यामे-औंकार, मे.हिरानंदानी या दोन बडया विकासकांकडून झालेला सदर | **गृहनिर्माण** |

| | | |
|---|---|---|
| | गैरव्यवहार दडपण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते यांच्याबरोबर ११ कोटींचा सौदा केल्याची बाब निदर्शनास येणे, यातील ४० लाखांची रक्कम त्यांना देण्यात आल्याचे सामजिक कार्यकत्यांनी पत्रकार परिषद घेऊन जाहिर करणे, सदर संपूर्ण प्रकरणाचे झालेले स्टींग ऑपरेशन दूरचित्रवाहिनीद्वारे प्रसारित होणे, परिणामी झोपडपट्टी पुनर्वसन योजनांमध्ये मोठया प्रमाणात होत असलेला गैरव्यवहाराचे वास्तव चित्र लोकांसमोर स्पष्टपणे येणे, झोपडपट्टीत राहणाऱ्या गोरगरीबांना चांगली घरे प्राप्त व्हावीत या उद्देशाने सुरु केलेल्या या योजनेत विकासक व अधिकारी संगनमताने मोठया प्रमाणात गैरव्यवहार करत असणे, नियमांना हरताळ फासून योजनांमध्ये मोठया प्रमाणात अनियमितता वाढत असल्याचे समोर येणे, यातून सर्वसामान्यांमध्ये तीव्र संतापाची व नाराजीची भावना असणे, शासनाने याबाबत दखल घेऊन चौकशी करुन झोपडपट्टी पुनर्वसन योजनांतर्गत होणारा गैरव्यवहार थांबविण्यासाठी कडक उपाययोजना करुन दोषींवर कडक कारवाई करणे संदर्भात शासनाने तातडीने करावयाची वा केलेली उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. | |
| १७ | मुंबईतील भायखळा येथील कारागृहात वॉर्डन असलेल्या मंजुळा शेटये या आरोपी महिलेची हत्त्या माहे जुलै, २०१७ च्या पहिल्या सप्ताहात घडल्याची उघडकीस येणे, अनेक वर्षापासून येथे महिला आरोपींवर लैगिंक अत्याचार होत असल्याची दाट शक्यता असणे, तसेच मंजुळा शेटयेवरील लैगिक अत्याचारात लाठीचा वापर झाल्याची तक्रार असून जेल अधिक्षकांसह पोलिसांनी कारागृहातील वीजपुरवठा खंडीत करुन मंजुळा शेटये यांना मारहाण केल्याची साक्ष इंद्राणी मुखर्जी या आरोपीकडून देण्यात येणे, तसेच तेथील वैदयकीय तज्ञांनी एन.व्ही.आर.मधून सी.सी.टीव्ही कॅमेराचे चित्रण मिळविले असून या चित्रणात जेलर मनिषा पोखरकर व एकूण सहा आरोपी महिला पोलिस मंजुळा शेटये हिला मारहाण करताना दिसत असणे व कारागृहातील पुरावे नष्ट करण्यासाठी देखील मालमत्तेची नासधुस करण्यात येणे, मंजुळा शेटयेच्या शिक्षेचा कालावधी काही दिवसातच पूर्ण होणार असल्याने तिची सुटका होणार होती, मात्र भायखळा कारागृहातील लैगिंक शोषणाचे अनेक धोगेदोरे मंजुळा शेटयेला माहित असल्याने सुत्रधारांनी तिची हत्त्या करण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती जनमानसात पसरलेली असणे, या प्रकरणाची राज्यभरातील लोकप्रतिनिधीकडून सी.आय.डी.चौकशी करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. | **गृह** |
| १८ | मुंबईतील सँडहर्स्ट रोड या हार्बर रेल्वेस्थानकाजवळील हँकॉक पूल पाडण्यात आल्याने या पुलाखाली अद्यापपर्यंत १८ जणांचा मृत्यु रेल्वेक्रॉसिंगमुळे झाल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ च्या शेवटच्या सप्ताहात उघडकीस येणे, सदर पूल पाडून दिड वर्षे झाले असून देखील यापुलाचे पुर्नबांधकाम मुंबई महापालिका व रेल्वे प्रशासनाने संयुक्तपणे सुरु केलेला नसणे, संबंधित मार्गावर अनेक शाळा व बाजारपेठा असल्याने स्थानिक लोकांना ये-जा करण्यास पर्याय नसल्याने वेळेचा अपव्यय होत असणे, तसेच त्याठिकाणी असलेल्या "फझलानी हायस्कुलची" त्या जागेवर मक्तेदारी वाढत असून शाळेच्या बस पार्किंगसाठी मुजोरी करणे, त्यामुळे स्थानिक रहिवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत असल्याने तेथील नागरीकांमध्ये पसरलेला असंतोष व चिडीची भावना आणि सदर हॅकॉक पुलाचे पुर्नबांधकाम तातडीने सुरु करण्याची लोकप्रतिनिधीकडून होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. | **नगर विकास** |
| १९ | मुंबईतील नालेसफाई व रस्ते कामांप्रमाणे कचरा वाहतुकीत मोठया प्रमाणात गैरव्यवहार सुरु असणे, मागील पाच वर्षात कचरा वाहतूकीत तब्बल एक हजार कोटी रुपयांचा घोटाळा झालेला असणे, या गैरव्यवहाराचा वरिष्ठ अधिका-यांमार्फत चौकशी करुन दोषी कंत्राटदार व अधिका-यांवर फौजदारी गुन्हे दाखल करुन कारवाई करण्याची होत असलेली मागणी, कचरा उचलण्यात मागील अनेक वर्षापासून ठराविक कंत्राटदाराला कंत्राट देण्यात येत असणे, डम्पींग ग्राऊंडपर्यंत किती कचरा वाहून नेला जातो याची नोंद पालिकेकडे नसणे, अनेकदा दोन टन कच-याच्या जागी एक टन कचरा वाहून नेला जातो मात्र बिल घेताना दोन टन कच-याचे घेण्यात येत असणे, एक लाख लोकसंख्येमागे एक कंत्राटदार असणे आवश्यक असणे मात्र मुंबईत २८ लाख | **नगर विकास** |

| | | |
|---|---|---|
| | लोकसंख्येमागे एक कंत्राटदार नेमला जातो, एकाच कंत्राटदाराला कचरा वाहतूकीस कंत्राट देण्यात येणे, कचरा उचलण्याप्रकरणी होत असलेल्या घोटाळाची सखोल चौकशी करुन तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रीया. | |
| २० | मुंबईतील बोरीवली येथील देवीपाडा येथे झोपडपट्टी पुर्नविकास प्राधिकरणाने मेसर्स सद्‌गुरु एन्टरप्रायजेसच्या विकासकांला ९ इमारती बांधण्याची मंजुरी देण्यात येऊन ९ इमारतीपैंकी विकासकाने ८ इमारती बांधून पूर्ण करणे, त्यापैंकी इमारत क्र.१ ते ४ या इमारती झोपडपट्टीधारकांसाठी असून इमारत क्र.५ ते ८ खुल्या विक्रीसाठी विकासकाने बांधलेल्या असणे, इमारत क्र.७ सिंधुदूर्ग एस.आर.ए सह.गृहनिर्माण संस्था ही विकासक असहकार तत्वावर नोंदणीकृत केलेली असून या संस्थेत १५० मध्यमवर्गीय सभासद वास्तव्यास असणे, या इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झालेले असून इमारत क्र.८ सद्‌गुरु मिलेमियन टॉवर सहकारी गृहनिर्माण संस्था या संस्थेला विकासकांच्या असहकार्यामुळे भोगवटा प्रमाणपत्र अद्यापही देण्यांत न येणे, इमारत क्र.७ व ८ यामध्ये असणारी जागा उद्यानासाठी आरक्षित ठेवण्यात आलेली असून अद्यापही विकासकाने जाणुनबुजून याठिकाणी उद्यान बांधलेले नसणे, आता या मोकळया व राखीव असलेल्या ठिकाणी विकासक प्रकल्पबाधितांसाठी महानगरपालिकेस देय असलेल्या जागेवर स्वतंत्र इमारत बांधण्याचा प्रयत्न करीत असल्याची बाब नुकतीच उघडकीस येणे, त्यामुळे तेथील रहिवाश्यांत पसरलेला तीव्र असंतोष, यासर्व प्रकरणाची चौकशी करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. | **गृहनिर्माण** |
| २१ | " राज्यात अनेक दुर्धर आजारांवर उपचार घेण्याकरीता देशभरातून अनेक रुग्ण येत असणे, मात्र हयांना दिली जाणांरी औषधे दर्जेदार आहे का हे तपासण्याकरीता सक्षम यंत्रणा अस्तित्वात नसल्याचे धक्कादायक चित्र असणे, राज्यातील ११ कोटी जनतेची औषध सुरक्षा ही फक्त १०० औषध निरीक्षकांच्या भरवशावर अवलंबून असणे अ ते गट ड या चार संवर्गासाठी ११७६ पदे मंजूर असणे, त्यातील तब्बल ४०७ पदे, औषध निरीक्षकांच्या १६१ मंजूर पदापैकी ६० आणि अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांच्या २६५ मंजूर पदांतील ८७ पदे रिक्त असल्याने जनतेच्या आरोग्याची काळजी घेणारा हा विभागच आय.सी.यु.मध्ये असल्याचे चित्र असल्याने औषधे व अन्न दर्जेदार आहे का हे तपासण्यासाठी सक्षम यंत्रणा अस्तित्वात नसणे, जनतेच्या आरोग्याशी निगडीत गंभीर प्रश्नी शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत जनतेत निर्माण झालेली तीव्र संतापाची भावना, परिणामी शासनाने तातडीने करावयाची वा केलेली उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया.” | **अन्न व औषध प्रशासन** |
| २२ | झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी विश्वास पाटील यांनी निवृत्तीच्या पाच दिवसाआधी झोपू च्या ४५० फाइली निकाली काढल्याची धक्कादायक बाब जुलै, २०१७ च्यासुमारास उजेडात येणे, विलेपार्ले येथील एका वास्तुरचनाकाराच्या मार्फत या सर्व फाइली निकालात काढण्याची माहिती उजेडात येणे, नोंदणीवहीत फाइलींची जावक तारीख ३० जून असली तरी त्यावर मागील २३ व २४ तारीख टाकून स्वाक्षरी करण्याचा प्रकार घडणे, सदरील प्रकारामध्ये मोठया प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे शक्यता निर्माण होणे, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकारणचे मुख्य कार्यकारी अधिका-यांनी निवृत्तीच्या पाच दिवसाच्या आधी ४५० निकाली काढल्या निर्णयाची चौकशी करुन तातडीने या प्रकरणी कारवाई करण्याबाबत करावयाची कार्यवाही व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रिया. | **गृहनिर्माण** |
| २३ | राज्यातील कुपोषण रोखण्यासाठी ठोस उपाययोजना करण्यास शासन अपयशी ठरत असणे, शासनाकडून कुपोषणाच्या मुळ प्रश्नाला हात न घालता आतापर्यंत केवळ वरवरच्या उपाययोजना करण्यात येणे, यातून कुपोषणाच्या प्रश्नाबाबत राज्य सरकार असंवेदनशील असल्याचे दिसून येणे, आदिवासी कुटूंबातील मुलांच्या कुपोषणाला सरकारची अनास्था जबाबदार असल्याबाबत उच्च न्यायालयाने शासनावर ताशेरे ओढले असणे, मुंबईत कुपोषणामुळे बालमृत्यू होत असल्याने मुंबईत अशी परिस्थिती असले तर राज्यातील दुर्गम भागात काय परिस्थिती असेल असा प्रश्न निर्माण होणे, कुपोषण रोखण्यासाठी | **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण** |

| | | |
|---|---|---|
| | शासनाकडून मोठया प्रमाणात निधी उपलब्ध देऊनही कुपोषणाचा प्रश्न सोडविण्यास राज्यशासनाला येत असलेले अपयश, सदरील निधी कुठे जातो हाही प्रश्न उपस्थित केला जात असणे, कुपोषण रोखण्यासाठी अधिकरी व कर्मचा-यांची नियुक्ती करण्याबाबत शासन उदासिन असल्याचे दिसून येणे, कुपोषणाचा गंभीर प्रश्न सोडविण्यास शासन कोणताचा बदल करीत नसणे, शासनाबाबत जनमानसात तीव्र असंतोष व चिडीची भावना निर्माण होणे, राज्यशासनाने कुपोषणांचा गंभीर प्रश्न सोडविण्याबात तातडीने करावयाची ठोस कार्यवाही व याबाबत राज्य शासनाची प्रतिक्रिया. | |
| २४ | मुंबई महापालिकेने नरिमन पॉईट ते मालाड-मार्वेपर्यंत पश्चिम बाजूस समुद्र किनारपटटीलगत काही भागात भराव टाकून रस्ता बांधणे, काही भागात पूल व उन्नत मार्ग, काही भागात बोगदे यांचा समावेश असलेलया ३५.६० कि.मी.लांबीचा समुद्रकिनारी मुक्त मार्ग (कोस्टल रोड) बांधण्याचा घेण्यात आलेला निर्णय, नरिमन पॉईट ते मालाड मार्वे पर्यंत समुद्र किनारी रस्ता प्रकल्पासाठी तांत्रिक सल्ल्यासाठी नियुक्त केलेल्या स्टूप कन्सल्टंट या सल्लागार कंपनीने केलेली भूगर्भ तपासणी आंतरराष्ट्रीय मान्यतेनुसार केलेली नसल्याने त्यामुळे पुन्हा एकदा भूगर्भ तपासणीसाठी सल्लागारांची निवड करण्याची वेळ महापालिकेवर आलेली वेळ, सदरील सल्लागार समितीवर महापालिकेने केलेला कोटयावधी रुपयांचा खर्च वाया जाणे, कोस्टल रोड प्रकल्पामुळे मुंबईच्या समुद्र किना-यावरील ऐतिहासिक स्थळांच्या सौदर्याला बाधा येत असल्याचा आक्षेप घेत हेरिटेज समितीने महापालिकेचा हा महत्वाकांक्षी प्रकल्प फेटाळण्यात येणे, मुंबई सागरी किनारी रस्त्यासाठी विविध परवानगींची आवश्यकता असून नौदलाच्यावतीने या किनारी मार्गाला परवानगी प्राप्त झालेली असलीतरी पर्यावरण आणि सीआरझेडची परवानगी अद्यापही मिळालेली नसणे, सदरील कोस्टल रोड तयार होण्यापुर्वी करोडो रुपये सल्लागार कंपनीवर खर्च करुनही कोस्टल रोड प्रकल्प उभारण्याबाबत कार्यवाही होण्यास विलंब होत असल्याने जनमानसात शासनाबाबत तीव्र असंतोष निर्माण होणे, राज्याशासनाने सदरील महत्वाकांक्षी प्रकल्प लवकरात लवकर पुर्ण करण्याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रीया. | **नगर विकास** |
| २५ | म्हैसाळ जिल्हा सांगली येथे भ्रण हत्येचे प्रकरण उघडकीस येऊन चार महिने उलटले तरी सदर प्रकरणी अद्याप दोषींवर कसलीही कारवाई करण्यात आलेली नसणे, पोलीसांनी या प्रकरणात ताब्यात घेतलेल्या भ्रण अवशेषाच्या डी.एन.ए. चाचणीत पाच भ्रण मुलींचे असल्याचे स्पष्ट होणे, सदर प्रकरणाच्या चौकशीसाठी शासनाने चौकशी समिती नेमुनही अद्यापही सदर समितीचा अहवाल सादर न होणे, आरोग्य विभागाच्या हलगर्जीपणामुळेच सदर प्रकरण घडणे, बेकायदा लिंगनिदान, गर्भपात रोखण्याच्या मोहिमेत ३ हजार पेक्षा जास्त ठिकाणी या कायद्याचे उल्लंघन करण्यात आल्याची गंभीर बाब निदर्शनास येणे, सांगली जिल्ह्यात डॉ.बाबासाहेब खिद्रापुरे हे अनेक वर्षांपासुन बेकायदा गर्भपात करीत असतानाही आरोग्य यंत्रणेने त्याकडे दुर्लक्ष केल्याचे स्पष्ट होणे, राज्यात बेकायदा लिंगनिदान, गर्भपात करणाऱ्या केंद्रावर कोणतीही कारवाई केली जात नसणे, राज्यातील अनेक दवाखान्यांनी बॉम्बे नर्सिंग होम ॲक्ट नुसार नोंदणी केलेली नसणे, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या जैव व वैद्यकीय कचऱ्याचे नियमानुसार संकलन केले जात नसल्याची गंभीर बाबही निदर्शनास येणे, या गंभीर बाबींची दखल घेऊन कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कारवाई व भुमिका. | **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण** |
| २६ | दिनांक २५ मे, २०१७ रोजी मा.मुख्यमंत्री प्रवास करीत असलेल्या हेलिकॉप्टरला निलंगा, जि.लातूर येथील शिवाजी विद्यालयाच्या मैदानाजवळ झालेला मोठा अपघात, या अपघातातून मा.मुख्यमंत्री व इतर सहाजण बचावले असले तरी हॅलिकॉप्टर सुस्थितीत आहे काय, उतरण्याचे ठिकाण सुरक्षित आहे काय, हॅलिपॅडची निगराणी राखण्यात येते काय, इत्यादी अनेक बाबींचा विचार होणे आवश्यक असणे, यामध्ये असलेल्या अनेक त्रुटी, यात अधिक दक्षता घेण्याची गरज, तसेच त्वरीत चौकशी करुन कारवाई करण्याची आवश्यकता, दिनांक ७ जुलै, २०१७ रोजी पुन्हा अलिबाग येथे मा.मुख्यमंत्री यांच्या हॅलिकॉप्टरला झालेला अपघात, यावरुन मा. मुख्यमंत्री यांच्या सुरक्षेचा निर्माण झालेला प्रश्न, त्याचीही चौकशी करण्याची गरज, यानिमित्ताने निर्माण झालेल्या प्रश्नांमध्ये | **सामान्य प्रशासन** |

| | | |
|---|---|---|
| | राज्य शासनाने अतिमहत्त्वाच्या व्यक्तीसाठी ऑगस्टा वेस्टलॅण्ड आणि फिनमेकॅनिका या वादग्रस्त असलेल्या कपंनीचे हॅलिकॉप्टर भाडयाने घेतलेले असणे, त्याचा फेरविचार करण्याची आवश्यकता, विमानसेवेद्वारे महाराष्ट्राच्या विकासाला चालना देण्यासाठी स्थापन केलेल्या महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनीद्वारे महत्त्वाची विमानतळ उभी राहिलेले नसून कंपनीकडे दीर्घकालीन धोरण नसल्याचा ठपका कॅग ने ठेवलेला असणे, त्यामुळे शासनाने १६८८ कोटी कोटी रुपये खर्च करुनही विमाने उडू शकलेली नसणे, याबाबींचाही विचार करण्याची आवश्यकता व हॅलिकॉप्टर अपघातासह या सर्व बाबींवर शासनाची प्रतिक्रिया. | |
| २७ | आंबेगाव तालुक्यातील (जि.पुणे) माळीण या गावांमध्ये ३० जुलै,२०१४ रोजी डोंगरकडा कोसळून संपूर्ण गाव गाडले गेलेले असणे, या दुर्घटनेत १५१ जणांचा मृत्यु झालेला असणे, त्यानंतर राज्य शासनाने माळीण गावापासून जवळच आमडे गावाच्या हद्दीत त्यांचे पुनर्वसन केलेले असणे, गेल्या एप्रिल, २०१७ मध्ये सर्व सुविधांनी सज्ज असलेल्या पुनर्वसित माळीण गावाचे मा.मुख्यमंत्री यांच्या हस्ते लोकार्पण केलेले असणे, जून महिन्यात पडलेल्या संततधार पावसामुळे ठिकठिकाणी भराव खचल्याने राहत्या घरांच्या भिंतींना मोठया प्रमाणात तडे गेलेले असणे, तर रस्ते खचणे तेथील अंगणवाडी जवळील मोठी भिंत कोसळल्याने शाळेला धोका निर्माण झालेला असणे, माळीण गावाचे पुनर्वसन होऊन अवघे चार महिने झाले नाहीत तोच येथे झालेल्या कामाच्या दर्जाबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झालेले असणे, पुनर्वसनाचे काम निकृष्ट झाल्याने पुन्हा एखादा धोका निर्माण झाल्याने ग्रामस्थांमध्ये कमालीचे भितीचे वातावरण निर्माण होणे, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व करावयाची तातडीची कार्यवाही. | **मदत व पुनर्वसन** |
| २८ | राज्यातील जिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय व प्राथमिक आरोग्य केंद्रात श्वान दंशाच्या लसीचा मोठयाप्रमाणात तुटवडा असल्याची बाब नुकतीच उघडकीस येणे, सन २०१६-१७ मध्ये आरोग्य विभागाने केंद्रीय स्तरावर श्वान दंशावरील लसीची खरेदी न केल्यामुळे ही परिस्थिती उद्भवल्याची धक्कादायक बाब नुकतीच उघडकीस येणे, सध्या स्थानिक पातळीवर ही लस १३७ रुपये प्रतिवायल या दराने शासनाकडून खरेदी करण्यात येत असून भारत बायोटेक ही कंपनी हीच लस १२६ रुपये प्रतिवायल दराने देण्यास तयार असताना सुध्दा ही लस त्या कंपनीकडून घेण्यात न येणे, त्यामुळे शासनाचे होत असलेले लाखो रुपयांचे नुकसान, राज्यात सुमारे अडीच लाख व्यक्तींना कुत्रे चावले असल्याच्या घटना घडत असतांना त्यासाठी १२ लाख वायल दरवर्षी खरेदी करण्यात येत असणे, परंतु स्थानिक पातळीवर प्रतिवायल १३७ रुपये दराने खरेदी करण्यात येत असून शासनाचे नुकसान टाळण्यासाठी निविदा मागवून या लसीची खरेदी करण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना. | **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण** |
| २९ | दिनांक १४ एप्रिल ते १७ एप्रिल,२०१७ या कालवधीच्या सुमारास आमदार निवास नागपूर येथील खोलीत एका अल्पवयीन मुलीवर सतत चार दिवस सामुदायिक बलात्कार झाल्याची घडलेली गंभीर घटना, याबाबत तातडीने चौकशी करुन कारवाई करण्याची गरज, आमदार निवासाच्या सदर खोलीचा वापर नियमबाहय पध्दतीने करण्यात आलेला असणे, लोकप्रतिनिधींच्या वास्तव्यासाठी असलेल्या आमदार निवासात अशी घटना घडल्यामुळे जनमानसात उमटलेल्या तीव्र स्वरुपाच्या प्रतिक्रिया, राज्यात निर्माण झालेली संतापाची भावना, आमदार निवास व्यवस्थापनाच्या वरिष्ठ अधिका-यांचे बेजबाबदार स्वरुपाचे असलेले वर्तन, त्यांच्याकडून कर्तव्यात करण्यात आलेली अक्षम्य कसूर याबाबत सखोल चौकशी करण्याची आवश्यकता, लोकप्रतिनिधींच्या वास्तव्यासाठी असलेल्या आमदार निवासाचा अशाप्रकारे वापर होऊ नये, यासाठी शासनाने विशेष दक्षता घेण्याची आवश्यकता, यात शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, यावर शासनाची प्रतिक्रिया व करावयाची कारवाई. | **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम)** |

| | | |
|---|---|---|
| ३० | पुणे येथे आंतरराष्ट्रीय विमानतळ उभारण्यासाठी जागेची निवड करण्यासाठी राज्य शासन व भारतीय विमान प्राधिकरण यांचेमार्फत दिनांक ११ सप्टेंबर, २०१६ रोजी पुणे जिल्हयातील विविध ठिकाणच्या जागांची पाहाणी करुन पुरंदर येथील ठिकाण विमानतळासाठी योग्यअसल्याचे नोंदविलेले मत, त्याबाबतचा अहवाल राज्य शासनास सादर केलेला असणे, यासाठी निविदा प्रक्रिया पूर्ण करणे आणि "Detailed Techno Econodic Feasibility Study" बाबतच्या कार्वाहीसाठी उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी यांच्या अध्यक्षतेखाली तांत्रिक सल्लागार समिती नेमण्यात आलेली असणे, या समितीत सिडको, भारतीय विमानपत्तन प्राधिकरण, मिहान इंडिया लि. व महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी यांचे प्रतिनिधी असणे, सदर समितीच्या अहवालनुसार पुढील कार्यवाही करण्याचा घेण्यात आलेला निर्णय, मात्र समितीचा अहवाल सादर होण्यास होत असलेला विलंब, परिणामी पुढील कार्यवाहीवर होणारा परिणाम, पुणे जिल्हयातील पुरंदर हे १४ जिल्हयांचे मध्यवर्ती ठिकाण असल्यामुळे तेथे सुमारे दीड लाख रोजगार उपलब्ध होऊन अनेक पायाभूत सुविधांच्या माध्यमातून विकासाचे महत्वपूर्ण काम होणार असणे, त्यामुळे राज्याच्या विकासास हा विमानतळ मोठया प्रमाणात सहाय्यभूत ठरणारा असणे, या सर्व बाबीं विचारात घेता निधीच्या उपलब्धतेसह आवश्यक ती कार्यवाही प्राधान्याने करण्याची गरज व यावर शासनाची प्रतिक्रिया. | **सामान्य प्रशासन** |
| ३१ | हृदयशस्त्रक्रियांमध्ये वापरण्यात येणा-या सेंट, कॅथेटर, बलूनससारख्या वैद्यकीय सामुग्रीसाठी रुग्णांकडून उत्पादन किंमतीपेक्षा दहापट अधिक किंमत आकारली जात असणे, वैधमापन शास्त्र विभागाने मुंबईतील आठ मोठया रुग्णालयांवर टाकलेल्या छाप्यातून धक्कादायक वास्तव माहे मे-२०१७ च्यासुमारास उजेडात येणे, दुप्पट एमआरपी किंमती आकारलेले स्टेंट, कॅथेटर, बलून डिव्हाइस या हृदयशस्त्रक्रियांमध्ये वापरण्यात येणा-या सामुग्रीचा रुग्णालयांकडून तसेच उत्पादक साखळीकडून ही लूट सुरु असणे, सदरील प्रकार राज्यातील इतर रुग्णालयांकडून सुरु असणे, असहाय्य रुग्णांची बेसुमार लूट थांबविण्याबाबत शासनाकडून होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, हृदयशस्त्रक्रियेच्या सामुग्रीच्या माध्यमातून गोरगरीब रुग्णांनाचे होत असलेले लूट करणा-या संबंधीत रुग्णालयांवर तातडीने कारवाई करुन हृदयशस्त्रक्रियेची साधनसामुग्री रुग्णांना रास्त भावात उपलब्ध करुन देण्याबाबत करावयाची कार्यवाही व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रीया. | **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण** |
| ३२ | नागपूर येथील शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालय (मेडीकल) येथील बाहय रूग्ण विभागात वेळेत डाॅक्टर उपलब्ध राहत नसल्यामुळे रूग्णांना रांगेत डाॅक्टरांची वाट पाहण्याची येत असलेली पाळी, डाॅक्टरांची रूग्णालयात येण्याची वेळ ८.३० असतांना सुध्दा १०.०० वाजूनही डाॅक्टर उपलब्ध होत नसल्याने रूग्णामध्ये निर्माण झालेला संताप, त्यामुळे रुग्णांनी डाॅक्टरांच्या कॅबीनला कूलूप लावण्याची होत असलेली रूग्णाची मागणी, याबाबत वारंवार वरिष्ठाकडे तक्रारी दाखल करूनही त्यावर न होणारी कार्यवाही, त्यामूळे रूग्णानाचे होत असलेले हाल, आरोग्य विभागाचे याकडे होत असलेले दुर्लक्ष, शासनाने यांची गंभीर दखल घेण्याची आवश्यकता, त्यामुळे रूग्णामध्ये निर्माण झालेली संतापाची लाट, शासनाने याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना | **वैद्यकीय शिक्षण** |
| ३३ | मुरबाड तालुक्यातील (जि.ठाणे) येथील आदिवासी आश्रमशाळांना आठ महिन्यांपासून शासनाने धान्य पाठविले नसल्यामुळे येथील विदयार्थ्यांवर उपासमारीची वेळ आली असल्याचे माहे मार्च, २०१७ दरम्यान निदर्शनास येणे, आदिवासी मुलांना राहण्याची व मोफत शिक्षण देणारी वसतीगृहे सरळगाव, मुरबाड तळेगाव, सिरोशी येथे असणे, येथील विदयार्थी वाल्हिवरेतील तीन आश्रमशाळात शिक्षण घेत असणे, या आश्रमशाळांना महिन्याला २७० क्विंटल तांदुळ व १५० क्विंटल गहू सवलतीच्या दरात मिळत असणे, मात्र शासनाने येथे आठ महिन्यापासून धान्य पुरवठा बंद केला असणे त्यामुळे येथील आदिवासी मुलांनी शाळा सोडून पालकांसोबत जंगलात रानमेवा गोळा करणे, मासेमारी करणे सुरु केले असणे, यामुळे या मुलांचे शैक्षणिक भवित्य धोक्यात आले | **आदिवासी विकास** |

| | | |
|---|---|---|
| | असतानाही शासन करीत असलले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी या मुलांच्या पालकांत पसरलेला असंतोष म्हणून शासनाने सदर आश्रमशाळांना नियमित व सुरळित धान्यपुरवठा करण्याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. | |
| ३४ | शासनाच्या आदिवासी विकास विभागातील अधिका-यांनी लाभार्थ्यांना वाटण्यात येणा-या गायी, म्हशी,शेळया यांचया वाटपात कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार केला असल्याचे माहे मे, २०१७ च्यासुमारास उजेडात येणे, इतकेच नव्हे तर नांगर,बैलगाडी, ताडपत्री, भाजणीचे उपकरण, मळणीचे यंत्र डिजिटल कॅमेरा अशा विविध साहित्यांच्या योजनांतही प्रत्यक्ष लाभार्थीना त्यांचे वाटप न करता कोट्यावधी रुपयांचा अपहार त्यांनी केला असल्याचे एम.जी.गायकवाड चौकशी समितीच्या अहवालातून उघडकीस आले असतानाही शासन करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण त्यामुळे शासनाने या अहवालानूसार अपहार करणा-या सबंधितांवर फौजदारी कारवाई करण्याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रीया. | **आदिवासी विकास** |
| ३५ | राज्यातील काही औषध क्षेत्रातील कंपन्याचे विक्रेते अस्थिव्यंग शस्त्रक्रीयेत वापरण्यात येणा-या इम्प्लाण्टच्या मूळ किंमतीवर ३० ते ४० टक्के दर आकारुन रुग्णांची खुलेआम लूट करीत असल्याचे माहे जुलै-२०१७ च्यासुमारास उजेडात येणे, बदलत्या जीवनशैलीमुळे अस्थिव्यंगाच्या शस्त्रक्रिया सर्रास होत असणे तसेच या शस्त्रक्रिया सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर असणे, फ्रॅक्चर झाल्यावर पारंपारिक प्लास्टरऐवजी नट-बोल्ट किंवा प्लेंट लावल्या जात असणे,त्यांच्या पॅकिंगवर एमआरपी नमूद केलेले नसल्याने भारतीय बनावटीच्या कृत्रिम सांधे किंवा खुब्याच्या मूळ किंमतीपेक्षा ३० ते ४० टक्के जादा किंमत आकारुन रुग्णांची लुट सुरु असणे तसेच सध्या बनावट इम्प्लाण्टचा व्यवसाय तेजीत असणे, हे इम्प्लाण्ट बनावट आहे की अस्सल ते तपासण्याची सोय डॉक्टारांकडे नसणे बनावट इम्प्लाण्टबाबत अनेक डॉक्टर अनभिज्ञ असणे त्यामुळे इम्प्लाण्टचा दर्जा व किंमतीवर नियंत्रण ठेवणारी यंत्रणा नसल्याने या बाबींकडे शासनाकडून होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष त्यामुळे जनमानसात पसरलेला असंतोष व चिंतेचे वातावरण, त्यामुळे इम्प्लाण्टचा दर्जा व किंमतीवर नियंत्रण आणण्याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रीया | **अन्न व औषध प्रशासन** |
| ३६ | अन्न आणि औषधे प्रशासनाच्या मुंबई, औरंगाबाद आणि नागपुर येथे तीन लॅबोरॅटरी असणे, औषधे आणि अन्न प्रशासनाच्या निरिक्षकांनी घेतलेली सॅम्पल टेस्टींग करुन त्याचा निकाल १४ दिवसांत देण्याचे लॅबोरेटरीवर बंधनकारक असणे, या तिन्ही लॅबोरेटरीमध्ये एकुण ५२ तांत्रिक आणि प्रशासकीय जागा नोव्हेंबर २०१६ अखेर रिक्त असल्याची माहिती अधिकारांतुन दि. १८ एप्रिल २०१७ किंवा त्या दरम्यान निदर्शनास येणे. या रिक्त पदामुळे मुंबई लॅबोरेटरीमध्ये नोव्हेंबर २०१६ अखेर औषधांच्या ९५८ आणि अन्नांच्या ११३४ सॅम्पलची टेस्टींग प्रलंबित असणे, तर औरंगाबाद २१३ आणि नागपुर मध्ये ६० सॅम्पलची टेस्टींग असणे. या सॅम्पलच्या टेस्टींगचा प्रलबिंत काळ ३ ते ४ महिने इतका असणे या सॅम्पल टेस्टींगच्या प्रलंबित कालावधिमध्ये सदोष औषधे आणि भेसळयुक्त अन्न व फळे भाज्यांना रंग लावत असणे, सफरचंदाना मेण लावुन चकाकी आणणे, गाजरांना लाल रंग लावत असणे, दुधी, अंळबी व इतर भांज्यान लवकर वाढीचे इंजेकशन देते असणे, हॉटेला तील पदार्थात, हातगाडयावरील चायनीज पदार्थात रंग भेसळ करीत असणे, जे आरोग्याला घातक असणे, यांचा वापर ग्राहकांकडुन होणे. महाराष्ट्रांत वाढलेले शिक्षणांचे प्रमाण आणि त्यामुळे जागृकता वाढणे. महाराष्ट्र आणि महाराष्ट्र बाहेरुन औषधे आणि अन्न मोठया प्रमाणात येणे, नागरिकांच्या सुरक्षित आरोग्यासाठी त्यांच्या मोठया संख्येने सॅम्पलची तत्काळ टेस्टींग करण्याची शासनाची जबाबदारी परंतु औषधे आणि अन्न औषधे प्रशासनांच्या तिन्ही लॅबोरेटरीमध्ये असलेल्या रिक्त पदामुळे आरोग्यांची सुरक्षितता धोक्यात असल्याची नागरींकाची भावना त्यामुळे निर्माण झालेली तीव्र चिंता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. | **अन्न व औषध प्रशासन** |

| | | |
|---|---|---|
| ३७ | थॅलेसेमिया रोगाचा सामना करणा-या रुग्णांच्या संखेत दिवसेंदिवस वाढ होत असून, यामध्ये बालरुग्णांचे प्रमाण सर्वाधिक असणे, ठराविक कालावधीत ब्लड ट्रान्समिशन, चाचण्या अशी उपचार पध्दती असणा-या या रुग्णांच्या औषधांच्या कोर्समध्ये खंड पडल्यास या रुग्णांच्या यकृताला सूज येण्याची भीती असल्याने त्यांना डेफ्रिजेट आणि डेसिरॉक्स ही औषधे नियमित देणे गरजेचे असणे, मात्र हि औषधे सर्वसामान्य दुकानात अतिशय महागडी मिळत असल्याने गोर-गरीब रुग्णांची होत असलेली परवड , आठ महिन्यांपुर्वी ठाणे येथील सिव्हील रुग्णालयातील औषधांचा साठा संपल्याने रुग्णांच्या पालकांना अन्य सेन्टर्सचा आधार घ्यावा लागत असणे मात्र आजमितीस राज्यातील सर्वच रुग्णालयात हा साठा उपलब्ध नसणे, आरोग्य विभागाकडे वारंवार चौकशी केली असता टेंडर प्रक्रिया पूर्ण न झाल्याने हा साठा पोहचविण्यात आला नसल्याचे मागील आठ महिन्यांपासून सांगण्यात येत असणे, याबाबत लोकप्रतिनिधींनी संबंधित मंत्री व आरोग्य संचालकांशी वारंवार संपर्क साधण्यात आलेला असताना त्यास योग्य प्रतिसाद न मिळणे, यामुळे याप्रकरणातील आरोग्य विभागाच्या प्रशासकीय कारभाराचा भोंगळपणा स्पष्ट होत असने, साधारणपणे ज्या अत्यावश्यक गोष्टी आहेत त्याची पूर्व तजवीज करून ठेवणे गरजेचे असणे किंवा त्याबाबत काही धोरणात्मक निर्णय घेऊन रुग्णांना कोणत्याही परिस्थितीत अत्यावश्यक औषधे मिळण्यात खंड पडणार नाही याची काळजी घेणे गरजेचे असताना याबाबीकडे संबंधितांनी जाणीवपूर्वक दीर्घ काळ दुर्लक्ष केलेले असल्याने, ठाणे जिल्ह्यासह राज्यातील हजारो रुग्णांना व त्यांच्या नातेवाईकांना मागील आठ महिन्यांपासून अनेक अडचणी व संकटांचा सामना करावा लागत असल्याने, थॅलेसेमियाग्रस्त रुग्णांना रोजचा औषधाचा डोस न मिळाल्यास त्यांना होणारा त्रास व त्याचा त्यांच्या शरीरावर होणारा परीणाम याची आरोग्य विभागाला जाणीव असतानाही त्याबाबत योग्य ती उपाययोजना करण्यात अपयशी ठरलेल्या राज्याच्या आरोग्य विभागातील संबंधित दोषींची सखोल चौकशी होऊन रुग्णांच्या जीविताशी खेळणारावर तातडीने कठोर कारवाई करून थॅलेसेमिया रुग्णांना लागणारा पुरेसा औषधासाठा तातडीने उपलब्ध करून देण्याची आवश्यकता, याबाबत सरकाराने करावयाची कार्यवाही, केलेली कारवाई व सरकारची भूमिका. | **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण** |
| ३८ | राष्ट्रीय गुन्हे नोंदणी अहवालानुसार सन २०१७ मध्ये महिला विनयभंगाच्या व बलात्काराच्या घटनांमध्ये महाराष्ट्र राज्य पहिल्या क्रमांकावर असल्याचे जुलै-२०१७ च्यासुमारास निदर्शनास येणे, राज्यात महिलांवरील अन्याय व अत्याचाराचच्या घटना वाढत असणे, दररोज प्रसारमाध्यमातून महिलांवरील अत्याचाराच्या घटना समोर येणे, याशिवाय महिलांवरची अत्याचाराची प्रकरणे न्यायालयात मोठया प्रमाणावर प्रलंबित असणे, राज्यातील महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर झाला असताना शासन करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी महिलांमध्ये पसरलेले भितीचे व चिंतेचे वातावरण, यामुळे शासनाने राज्यातील महिलांच्या सुरक्षेबाबत करावयाची तातडीचे उपाययोजना व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रीया | **गृह** |
| ३९ | कमी इंधन देऊन ग्राहकांची फसवणूक करणाऱ्या अनेक पेट्रोल पंप चालकांचे पितळ ठाणे पोलिसांनी मे व जून, २०१७ मध्ये उघड केलेलं असल्याने, पेट्रोल पंप चालकांकडून ग्राहकांची फसवणूक होत असल्याच्या घटनेला आता प्रत्यक्ष दुजोरा मिळालेला असणे, त्यामुळे ठाणे जिल्ह्यासह राज्यातील सर्वच पेट्रोल पंपांची तपासणी करण्याची निर्माण झालेली गरज, याबाबत शासनाकडून कठोर पावले उचलण्याची सर्वसामान्य जनतेची अपेक्षा, शासनाकडून मात्र याबाबत फारसी उत्सुकता दाखवण्यात आलेली नसणे, त्यामुळे शासनाच्या या कृतीबद्दल सर्वसामान्य नागरिकांमध्ये निर्माण झालेले संतापाचे वातावरण, सबब राज्यातील सर्वच पेट्रोल पंपांची स्वतंत्र यंत्रणेमार्फत तपासणी करून नियमबाह्य पेट्रोल पंप चालकांवर कारवाई होण्याची आवश्यकता, त्याचप्रमाणे सर्वसामान्य जनतेची फसवणूक करून केलेली लुट विनाविलंब वसूल करून ती शासनाच्या कोषागारात जमा करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही, केलेली कारवाई व शासनाची प्रतिक्रिया. | **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण** |

| | | |
|---|---|---|
| ४० | परभणी जिल्हयात बँकाशी संगनमत करुन हजारो शेतक-यांच्या नावे कर्ज उचलण्याचा प्रकार 'गंगाखेड शुगर अँड एनर्जी' च्या रत्नागर गुटटे यांनी केलाचा प्रकार माहे जुलै-२०१७ च्या पहिला आठवडयात उजेडात येणे, या प्रकरणाबाबत गंगाखेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात येणे, तब्बल आठ ते दहा हजार शेतक-यांच्या नावे ३२८ कोटी रुपये उचलून फसवणूक व अपहार केल्याचे उजेडात येणे, त्यामुळे आठ ते दहा हजार शेतकरी अडचणीत येणे, आंध्रा बँकेकडून ३९.१७ कोटी, युनायअेट बँक ऑफ इंदिया ७६.३२ कोटी, बँक ऑफ इंडिया ७७.५९ कोटी, सिंडीकेट बँक ४७.२७ कोटी, युको बँक ४७.७८ कोटी, रत्नाकर बँक ४०.२० कोटी अशी एकूण ३२८ रुपयांचे व्यवहार गंगाखेड शुगर्सच्या माध्यमातून करण्यात येणे, हजारो शेतक-यांच्या नावार कर्ज दिल्याचे व ते परस्पर गंगाखेड शुगर अँड एनर्जी कारखान्याच्या नावावर वळते करुन घेण्यात येणे, रत्नाकर गुटटे यांनी उचललेल्या कर्जाची अनेक शेतक-यांना कल्पनाही नसणे, सदरील फसवणूकीचा प्रकार मोठा गंभीर असून या प्रकरणाची सखोल चौकशी करुन सदरील कर्जघोटाळाची वसूली करुन आवश्यक ती कारवाई तातडीने करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया. | **गृह** |
| ४१ | मुंबई शहरातील शीव रुग्णालयात सुमारे ३ हजार खाटा असून, येथे वर्षाकाठी जवळपास २० लाख रुग्ण 'बाह्यरुग्ण विभागात' उपचार साठी येत असणे तर ८५ हजार रुग्ण उपचारासाठी दाखल होत असतात.वर्षाकाठी सुमारे ९० हजार शस्त्रक्रिया होणा-या या रुग्णालयाच्या इमारतीची देखरेख व दुरुस्ती वेळेवर होणे गरजेचे असताना, पालिका प्रशासनाकडून याबाबत अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याची बाब जून, २०१७ च्या शेवटच्या आठवड्यात उघडकीस आलेली असणे,या रुग्णालयाच्या दुरुस्तीच्या प्रस्तावास चार वर्षापूर्वी मान्यता मिळाली असताना व दोन वर्षापूर्वी निविदा काढण्यात आलेली असताना, एजन्सी नेमण्याचा मुहूर्त न मिळाल्याने या रुग्णालयाच्या रक्तपेढीला आजमितीस टेकू लावून कामा करणा-या अधिकारी कर्मचा-यांवर जीव मुठीत धरून कर्तव्य बजावण्याची आलेली पाळी, पालिका प्रशासनाच्या दिरंगाईमुळे यावर्षीच्या पावसाळ्यात रुग्णालयात मोठ्या प्रमाणावर गळती होण्याची भीती रुग्णालयाच्या डॉक्टरांकडून व्यक्त केली जात असणे, हजारो रुग्णांचा आधार असलेल्या रुग्णालयाच्या देखभाल दुरुस्तीबाबत पालिका प्रशासनाकडून जाणीवपूर्वक करण्यात येत असलेल्या दिरंगाईची तातडीने सखोल चौकशी होण्याची आवश्यकता असून, संबंधित दोषींवर कठोर कारवाई करतानाच डॉक्टर, कर्मचा-यांसह रुग्णांना विनाविलंब सुरुक्षित सेवा मिळण्याची आवश्यकता, याप्रकरणी शासनाने विनाविलंब करावयाची कार्यवाही, केलेली कारवाई व शासनाची प्रतिक्रिया. | **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण** |
| ४२ | अंबरनाथ (जि. ठाणे ) येथील चिखलोली धरणात जून २०१७ मध्ये घातक केमिकलच्या गोण्या टाकल्याची धक्कादायक बाब उघडकीस आलेली असतानाच, जुलै, २०१७ च्या पहिल्या आठवड्यात जीआयपी धरण क्षेत्रात केमिकल कचरा तसेच कंपन्यांतून निघणा-या अन्य कच-याचा मोठा साठा टाकण्यात आल्याचे उघडकीस आलेले असणे, त्यामुळे रेल्वेच्या या धरण क्षेत्रातून मिसळला जाणा-या केमिकल कचऱ्यामुळे रेल नीर च्या सुरक्षेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित झालेले असणे, त्यामुळे हजारो नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाल्याने, अंबरनाथ तालुक्यातील धरणांची व त्यातील पाणी साठ्याची सुरक्षा धोक्यात आलेली असणे, याप्रकरणी शासनाने तातडीने ठोस उपाययोजना करण्याची आवश्यकता, याप्रकरणी शासनाने विनाविलंब करावयाची कार्यवाही, केलेली कारवाई व शासनाची प्रतिक्रिया. | **पर्यावरण** |
| ४३ | नवी मुंबई मधील खारघर येथे दि. ३१ मार्च, २०१७ रोजी डीएनए वृत्तपत्राचे पत्रकार सुधीर सूर्यवंशी यांच्यावर अज्ञान व्यक्तींकडून हॉकी व लोखंडी रॉडने हल्ला करुन गंभीर जखमी केल्याची घडना घडणे, गेल्या काही दिवसात पत्रकार आणि व्हिडीओ जर्नलिस्ट यांच्यावर हल्ले आणि धमक्या देण्याच्या घटना मोठया प्रमाणावर वाढल्या असणे, झी चोवीस तासचे संपादक डॉ.उदय निरगुडकर, पत्रकार संजय गिरी, विनोद यादव, संदिप भारती, स्वाती नाईक, सुधीर सुर्यवंशी यांच्या बाबतीत या घटना घडल्या असणे, सुर्यवंशी, नाईक, भरती आणि गिरी यांच्यावर तर जीवघेणा हल्ला करण्यात येणे, टि.व्ही. जर्नलिस्ट | **सामान्य प्रशासन** |

| | | |
|---|---|---|
| | असोसिएशन या सर्व घटनांचा तीव्र शब्दात निषेध व्यक्त करणे, संबंधितांवर कठोर कारवाई करावी अशी मागणीही सरकारकडे करण्यात येणे, माध्यमांचा प्रभाव वाढत असताना पत्रकारांना त्यांच्या अभिव्यक्ति स्वातंत्र्यानुसार काम करुन न देणे हे लोकशाहीला घातक ठरणार असणे, लोकशाही अधिक सक्षमपणे राबवली जावी याची जबाबदारी सरकारची असणे, म्हणूनच पत्रकारांना संरक्षण देणारा कायदा लवकरात लवकर आणून लोकशाहीचा चौथा स्तंभ अधिक मजबूत करावी अशी अपेक्षा सरकार कडून करण्यात यावी अशी पत्रकारांची मागणी असणे, पत्रकारांवर वारंवार हल्ले होत आहेत हे गंभीर बाब असणे, पत्रकारांवरील हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर त्यांना विशेष संरक्षण मिळावे आणि त्याकरिता कायदा करण्याची खूप वर्षापासूनची मागणी असणे, सन २०१६ या हिवाळी अधिवेशनामध्ये पत्रकारांना संरक्षण देणे, पेन्शन देणे, घरांचा प्रश्न सोडविण्याबाबत प्रश्न उपस्थित केला असता मा.मुख्यमंत्री महोदयांनी पत्रकांरावरील होणारे हल्ले रोखण्याबाबत कायदात तरतूद करण्यात येईल, पेन्शन आणि घरांचा पश्न तातडीने सोडविण्यात येईल असे आश्वासन दिले होते परंतू दिलेल्या आश्वासनाची अंमलबजावणी करण्यात न येणे, पत्रकारांना हक्कांचे घर मिळावे, संरक्षण मिळावे, पेन्शन सुरु करावी असा अनेक मागण्या प्रलंबित असणे, पत्रकारांवर हल्ले करण्याच्या घटनेत वाढ होत आहे परंतू त्यांच्या सुरक्षेतेबाबत शासनाकडून कोणतीच कार्यवाही करण्यात येत नसणे, राज्यातील पत्रकारांच्या विविध प्रश्न सोडविण्यासाठी शासनाकडून अक्षम्य दुर्लक्ष करीत असल्याने शासनाबाबत तीव्र असंतोष व चिडीची भावना निर्माण होणे, पत्रकार हे लोकशाहीचा चवथा स्तंभ असल्यामुळे सरकारने वेळोवेळी पत्रकारांसाठी कायदा आणू असे आश्वासन दिलेल्याची तातडीने अंमलबजावणी करण्यासाठी करावयाची कार्यवाही व याबाबत राज्य शासनाची प्रतिक्रीया. | |
| ४४ | सातारा जिल्हयातील ता.पाटण येथील महिंद धरणाच्या सांडव्याकडील बाजूचे भिंतीचे दगड निसटल्याने या धरणाची दुरावस्था झाल्याने तेथील जवळच्या गावांतील नागरीकांमध्ये धरण फुटण्याची भिती निर्माण झालेली असणे, तसेच सदर धरण फुटल्यास मोठया प्रमाणात जिवीतहानी व शेतीचे नुकसान होण्याची दाट शक्यता असणे, पावसाळयात पाण्याचा दाब जास्त प्रमाणात असल्याने पावसाळयातच धरण फुटण्याचा जास्त धोका असणे, कित्येक वर्षे धरणातील गाळ न काढल्याने पाण्याची साठवण क्षमता कमी झालेली असणे, तसेच या धरणासाठी कोणतीही सुरक्षा व्यवस्था नसल्याने येथे कुणीही सहजपणे ये-जा करीत असणे, पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांनी धरणाच्या वस्तुस्थितीची पाहणी करुन कृष्णाखोरे महामंडळाकडे धरणाच्या मजबुतीकरणासाठी ६५ लाख रुपयांचा प्रस्ताव पाठवूनही अद्याप पर्यंत महामंडळाने याकडे अक्षम्य दुर्लक्ष केलेले असणे, सदर बाब सार्वजनिक महत्वाची असल्याने याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. | **जलसंपदा** |
| ४५ | राज्य शासनाने रोकडरहित अर्थव्यवस्था (Cashless Economy) केशलेस व्यवहारांमध्ये रोख रक्कम वापर न करता चेक्स,क्रेडिट व डेबिट कार्ड, इंटरनेट बँकिंग,पेमेंट बॅक्स, मोबाईल वॉलेटस आदिडिजिटल माध्यमांद्वार व्यवहार करणा-या धोरणाला प्रोत्साहन देण्याचा घेण्यात आलेला निर्णय, राज्यात सायबर गुन्हयांचा आलेख दिवसेंदिवस वाढत असून गेल्या तीन वर्षात राज्यात ५८६१ सायबर गुन्हे दाखल झालेले असलेली नोंद व त्याला प्रतिबंध घालण्यासाठी सायबर सुरक्षेसाठी राज्य शासनाकडून ८३७ कोटी रुपये खर्चाचा प्रकल्प राबविण्याचा माहे एप्रिल-२०१७ च्यासुमारास घेण्यात आलेला निर्णय, राज्यात दिवसेंदिवस सायबर गुन्हयांमध्ये वाढ होत असून या गुन्हयांचा तपास कमी प्रमाणात होत असल्याने राज्यशासनाने केशलस धोरणामुळे सायबर सुरक्षतेचा प्रश्न ऐरणीवर येणे, मुंबई शहरात मोठया प्रमाणात सायबर गुन्हेगारांकडून सरकारी, संशोधनपर संस्था यांची संकेतस्थळे हॅक करुन माहिती चोरण्याचे प्रमाण वाढू लागले असणे, ग्रामीण व शहरी भागात इंटरनेटचा वापर जास्त होत असल्याने त्याचाच परिणाम मुंबई शहराचा सायबर गुन्हयांच्या बाबतीत पहिला नंबर लागत असणे, मुंबईमध्ये १२०० पेक्षा जास्त सायबर गुन्हे नोंदवण्यात येणे, प्रसिध्द, महत्वाच्या व्यक्तींच्या बँक खात्यातून इंटरनेटच्या सहाय्याने लाखो रुपये पळविण्याचे प्रकार सुरु असणे, सायबर गुन्हयांतील गुन्हयांची उखल लागण्याचे प्रमाण अत्यंत अल्प असणे, सायबर गुन्हे रोखण्यासाठी पोलिसांकडे | **गृह** |

| | | |
|---|---|---|
| | आवश्यकती अत्याधुनिक साधनसामुग्री व मनुष्यबळाची कमतरता असणे, राज्यातील वाढत्या सायबर गुन्हयांला आळा बसण्यासाठी आवश्यकती अत्याधुनिक यंत्रणा व मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच सायबर गुन्हे घडलेल्याबाबत शोध व शिक्षा देण्यासंबंधी शासनस्तरावरुन आवश्यकती उपाययोजना करण्याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रीया. | |
| ४६ | कोल्हापूरच्या अंबाबाईच्या मंदिरातील पुजारी व भाविकांचे वाद विकोपाला गेले असणे, कोल्हापूरच्या पालकमंत्री यांच्या उपस्थितीतच अंबाबाई मंदिरातील पुजारी अजित ठाणेकर यांना दि. २२.६.२०१७ रोजी बेदम मारहाण करण्यात येणे, कोल्हापूर अंबाबाई देवीची पुजा करणा-या पुजकांविरोधात भाविकांबरोबर वाद सुरु असणे, २ वर्षापूर्वी देवीच्या मुर्तीवर रासायनिक संवर्धन प्रक्रिया करण्यात आली पण तरीही मूर्तीवर पांढरे डाग दिसणे, काही दिवसापुर्वी देवीची घागरा चोळी नेसून पुजा करण्यात आली त्यामुळे कोल्हापूरकारांमध्ये संतापची लाट उसणे, संबंधित श्रीपुजकांवर गुन्हे दाखल करा अशी मागणी करण्यात येणे, अंबाबाईच्या साडयांमध्ये भ्रष्टाचार होत असल्याचा आरोप अंबाबाईच्या सेवा करणा-या श्रीपूजकांवर केला जात असणे, मंदिराभोवती असलेल्या दुकानांमधून आलेल्या ओटयामधल्या साडयांमध्ये खाबूगिरी होत असल्याचा आरोप असणे, श्रीपुजकांवर मंदिरातल्या संपत्तीबाबत गैरव्यवहराचा आरोप, देवीचे दागिने, रक्कम यांचा हिशेब सादर न करणे, असे अनेक आरोप कोल्हापूरच्या अंबाबाईच्या मंदिरातील श्रीपुजकांवर होत असणे, श्रीपुजकांना त्वरीत हटविण्याची मागणी भाविकांकडून करण्यात येत असणे, सदरील वाद वाढल्याने या भागात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणे, राज्यशासनाने कोल्हापूरच्या मंदिरातील पुजारी आणि भाविकांचा वाद मिटविण्याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रिया. | **विधी व न्याय** |
| ४७ | राज्यातील वनक्षेत्रात वाढ व्हावी म्हणून राज्याचे वनखाते कोटी-कोटींची वृक्षलागवड मोहीम राबवित असताना पर्यावरणवाद्यांच्या विरोधाला डावलून गोंदिया जिल्हयातील वनक्षेत्रातील १४१ हेक्टर अतिरिक्त वनजमीन अदानी उद्योग समूहाच्या प्रकल्पासाठी देण्यास केंद्राने तत्वत: मान्यता दिली असणे, राखेवरील संशोधन केंद्र सुरु करण्यासाठी अदानी उद्योग समूहाला गोंदिया वनविभागाने प्रकल्प परिसरातील लागून असलेली वनविभागाची १४१.९९ हेक्टर जमीन देण्यास तत्वत: मंजूरी देण्यात येणे, कोणत्या निकषावर वनजमीन देण्यात आले स्पष्ट करण्यात न येणे, अदानी उद्योग समूहाच्या प्रकल्पासाठी अतिरिक्त वन जमीन देणे ही गंभीरबाब असणे, तालुक्यात पूर्वीच वनजमिनीचे क्षेत्र कमी असणे याशिवाय त्यालगतच आंबेनाला प्रकल्प प्रस्तावित असणे, अशातच वनजमिनी खासगी उद्योगासाठी देणे चुकीचे असल्याने जनमानसात तीव्र असंतोष व चिडीची भावना निर्माण होणे, राज्यशासनाने प्रस्तावित प्रकल्पामुळे पर्यावरणाला धोका असल्याने अदानी खाजगी प्रकल्पासाठी १४१ हेक्टर वनजमीन देण्याबाबत परवानगी देऊ नये याकरीता तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रिया. | **वने** |
| ४८ | पावसाळयापूर्वी पुणे शहरातील नाल्यांच्या सफाईची कामे करण्यासाठी सुमारे १०३ कोटी रुपये खर्चाच्या निविदांना पुणे महानगरपालिकेने दिलेली मान्यता, त्यानुसार नालेसफाईची कामे झाल्याचे दर्शविण्याची झालेली कृती, माहे जून,२०१७ पासून पडलेल्या पावसात शहरातील अनेक रस्त्यांवर मोठया प्रमाणात पाणी साचून नाल्यांना पूर आल्यासारखी झालेली अवस्था, या कामांमध्ये मोठया प्रमाणात अनियमितता व गैरव्यवहार झाल्याच्या पुणे महानगरपालिकेकडे नागीरकांनी व लोकप्रतिनिधींनी केलेल्या अनेक तक्रारी, याबाबत प्रत्यक्ष पाहाणी करुन अहवाल देण्यासाठी पंधरा अधिका-यांची करण्यात आलेली नेमणूक, त्यांनी चौकशी अहवाल दिनांक १६ जूनप,२०१७ रोजीच्या सुमारास मा. महापौर यांना सादर केलेला असणे, त्यात नाले सफाईची कामे योग्य पध्दतीने झाली आहेत, अशी दिशाभूल करणारी माहिती असणे, प्रत्यक्षात नालेसफाई समाधानकारक झालेली नसून त्यात अनेक प्रकारच्या अनियमितता व गैरव्यवहार झालेले असल्याचे स्पष्ट होणे, सदर अहवालावर विचार करण्यासाठी मा. महापौर यांनी आयोजित केलेल्या बैठकीतही अनियमितता झालयाचे स्पष्टपणे दिसून आल्यामुळे सदर अहवाल फेटाळण्यात आलेला असणे, त्यानुसार चौकशी करुन दोषींविरुध्द कारवाई करण्याची आवश्यकता, मात्र चौकशीस होत | **नगर विकास** |

| | | |
|---|---|---|
| | असलेला विलंब, परिणामी दोषी व्यक्तींना मिळत असलेले सरंक्षण, पुणे शहरातील रस्त्यांवर सध्याच्या पावसाळयात मोठया प्रमाणात पाणी साचून नाल्यांना पूर येत असल्यामुळे नागरीकांना होत असलेला त्रास, जनतेला होणारा त्रास दूर व्हावा यासाठी व दोषींविरुध्द कारवाई करण्यासाठी शासनस्तरावरुन पुणे महानगरपालिकेला आदेश देण्याची गरज, यावर शासनाची प्रतिक्रिया व करावयाची कार्यवाही. | |
| ४९ | केंद्र शासनाने सन २०१५ मध्ये देशातील विविध शहरांमध्ये महत्त्वाच्या अनेक पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी स्मार्ट सिटी अभियान राबविण्याचा जाहिर केलेला निर्णय, सदर स्मार्ट सिटी योजनेत पुणे शहराची माहे जानेवारी,२०१६ मध्ये झालेली निवड, त्यानुसार पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशन कंपनीची करण्यात आलेली स्थापना, मात्र सदर कंपनीची कंपनी कायद्याखाली नोंदणी झाल्यामुळे ही कंपनी सरकारी कंपनी न राहाता ती खाजगी कंपनी म्हणून कार्यरत असणे, कंपनीने पुणे महानगरपालिकेच्या समन्वयातून पुणे शहरात विविध योजनांची अंमलबजावणी करणे अपेक्षित असताना वर्षभराचा कालावधी लोटल्यानंतरही दोन-तीन योजनांशिवाय अन्य योजनांची कामे सुरु झालेली नसणे, त्यामुळे विहित कालावधीत कामे पूर्ण करणे अशक्य असल्याची दिसत असलेली स्थिती, त्यामुळे योजनेवर होणारा विपरीत परिणाम, सदर कपंनीची खाजगी कंपनी म्हणून नोंदणी झाल्यामुळे या स्मार्ट सिटीच्या कंपनीला शासकीय दर्जा देता येणार नाही आणि त्यास शासकीय फायदेही देता येणार नाहीत असा कॅग ने घेतलेला आक्षेप, कॅगच्या या आक्षेपामुळे पुणे महानगरपालिकेला तीन हजार कोटी रुपयांच्या उलाढालींवर ९०० कोटी रुपयांचा कर भरावा लागण्याची निर्माण झालेली भिती, तसेच झाल्यास शहरातील नागरी सुविधांवर होणारा परिणाम, परिणामी नागरीकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागण्याचा निर्माण झालेला धोका, या एकंदर प्रकरणी राज्य शासनाने तातडीने लक्ष घालून निर्माण झालेले प्रश्न सोडविण्याची आवश्यकता, यावर शासनाची प्रतिक्रिया व करावयाची कार्यवाही. | **नगर विकास** |
| ५० | देशभरात वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) लागू झाला आणि पालिकेला आपला जकार कर बंद करावा लागणे, मुंबई महानगरपालिका देशातील सर्वात श्रीमंत आणि छोटया राज्या इतका अर्थसंकल्प असलेली महापालिका, जीएसटी लागू झाल्यामुळे जकातीपोटी पालिकेला गेल्या आर्थिक वर्षामध्ये सात हजार कोटी रुपयांहून अधिक उत्पन्न मिळणार मोठे उत्पन्न बंद होणे, त्यामुळे पालिकेला नागरी सुविधा आणि आस्थापना खर्च भागविणाचा प्रश्न निर्माण होणे, जकात कर बंद झाला आणि त्यामागोमाग अनेक प्रश्न ऐरणीवर येणे, मुंबईची सुरक्षिततेकरिता पूर्वी जकातीच्या निमित्ताने मुंबईच्या वेशीवर असलेल्या जकात नाक्यांवर मालवाहू वाहनांची तपासणी होत होती ती बंद झाल्याने व मालवाहू वाहनांची तपासणी थंडावल्याने वाहनांतून घातपात घडविण्याच दृष्टीने स्फोटकांचा साठा मुंबईमध्ये सहजरित्या आणू शकते त्यामुळे दहशतीचे वातावरण निर्माण होणे, जकात नाक्यावर काम करणा-या कर्मचा-यांच्या अस्थापनेचा प्रश्न निर्माण होणे, मुंबईसह वेशीवरील पाच मोठया आणि रेल्वे, मुंबई पोर्ट ट्रस्ट, विमानतळ आदी विविध ठिकाणी असलेल्या ६५ जकात नाक्यांच्या रिकामी झालेल्या जागेचा प्रश्न, जकात बंद झाल्याने राज्यातील पालिकेला निर्माण झालेला महसूलीचा प्रश्न तातडीने सोडविण्याबाबत करावयाची कार्यवाही व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रिया. | **नगर विकास** |
| ५१ | पुणे शहरातील २४ तास पाणी पुरवठा योजनेसाठी २ हजार २६४ कोटी रुपयांचे कर्जरोखे पुढील पाच वर्षात उभारण्याचा माहे जून,२०१७ मध्ये घेण्यात आलेला निर्णय, त्यातील पहिल्या टप्प्यतील २०० कोटी रुपये किंतीच्या कर्जरोख्यांच्या नोंदणीचा जून,२०१७ च्या शेवटच्या आठवडयाच्या सुमारास मुंबईत संपन्न झालेला कार्यक्रम, कर्ज रोख्यांपोटी पुणे महानगरपालिकेला ७.५९ टक्के दराने व्याज अदा करावे लागणार असणे, कर्ज आणि मुद्दलाची रक्कम दहा वर्षात फेडायची असणे, महानगरपालिकेने कर्ज काढून ही योजना राबविण्याचे ठरविण्यात आलेले असणे, त्यामुळे महानगरपालिकेवर मोठया प्रमाणात पडणारा आर्थिक ताण, परिणामी इतर नागरी सुविधांवर होणारा विपरीत परिणाम, नागरीकांवर नागरी सुविधांपासून वंचित राहण्याची ओढवणारी आपत्ती, | **नगर विकास** |

| | | |
|---|---|---|
| | यावर उपाययोजना म्हणून या योजनेसाठी केंद्र शासनाकडून व राज्य शासनाकडून अर्थसहाय्य उपलब्ध करण्याची नितांत गरज, यावर शासनाची प्रतिक्रिया व करावयाची उपाययोजना. | |
| ५२ | मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर गत अधिवेशनांनतर दिनांक १५ एप्रिल,२०१७, दिनांक १९ एप्रिल, २०१७, दिनांक ७ मे, २०१७ व दिनांक ३ जून,२०१७ रोजी झालेले भीषण अपघात, त्यात १३ हून जास्त प्रवाशांचे झालेले मृत्यू, अपघातात अनेक प्रवासी जखमी झालेले असणे, मोठया प्रमाणात वारंवार होत असलेली वाहतुकीची कोंडी, जून, २०१६ मध्ये पनवेल येथे झालेल्या भीषण अपघातांतर मा.मुख्यमंत्री यांनी जून,२०१६ मध्ये आयोजित केलेल्या बैठकीत मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर इंटेलिजंट ट्रॉफिक मॉनिटरींग सिस्टिम बसविण्यासह विविध उपाययोजना करण्याची केलेली घोषणा, त्याबरोबर संपूर्ण मार्गावर बायक्रेन रोप बसविणे, ओझर्डे येथील ट्रामा केअर सेंटर तातडीने सुरु करणे इत्यादीबाबत संदर बैठकीत घेण्यात आलेले निर्णय, मात्र त्यानुसार करावयाची कार्यवाही अद्यापही दृष्टीपथात दिसत नसणे, गेल्या वर्षभरात एक्स्प्रेस-वे वर घाट परिसरात उड्डाणपूल आणि भुयारी मार्गासह आठ पदरी रस्त करण्याच्या कामास देण्यात आलेली मंजूरी, मात्र याबाबतही काहीच कार्यवाही झालेली नसणे, या महामार्गावर अनेक धोकादायक ठिकाणे असून तेथे दरडी कोसळून मोठे अपघात होण्याची भिती असतानाही त्याकडे होत असेले दुर्लक्ष, वाढते अपघात व वाहतूक कोंडी नियंत्रणात आणण्यासाठी ५६ ठिकाणी हाईट बॅरिअर योजना राबविण्याची सुरु करण्यात आलेली कार्यवाही, मात्र  सदर योजना अंमलात आणताना निर्माण होणा-या अडचणी तसेच तांत्रिक बाबींचा अभ्यास करण्यात आलेला नसल्यामुळे योजना यशस्वी न होता त्यावर झालेला लाखो रुपयांचा खर्च वाया गेलेला असणे, या सगळया प्रकारांवरुन एक्स्प्रेस-वे कडे अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याचे स्पष्टपणे दिसून येत असणे, यामुळे मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर अपघातांची मालिका सुरुच असून ती यापुढेही सुरु रहाण्याचा निर्माण झालेला धोका, वाहतुकीचीही कोंडी सतत होण्याची निर्माण झालेली स्थिती, परिणामी या महामार्गावर जीवित व वित्त हानी होण्याची असलेली शक्यता, त्यामुळे प्रवाशांमध्ये निर्माण झालेले भितीचे, असुरक्षिततेचे व संतापाचे वातावरण, यात तातडीने लक्ष घालण्याची गरज व यावर शासनाची प्रतिक्रिया व करावयाच्या उपाययोजना. | **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम)** |
| ५३ | राज्यातील शासकीय व अनुदानित आश्रमशाळांना शिकणाऱ्या मुलांना पुरेशा आरोग्याचा, आहाराच्या तसेच शिक्षणाच्या सुविधा मिळत नसल्याने गेल्या ३ वर्षात या आश्रम शाळांमध्ये दरवर्षी सरासरी १५० विद्यार्थ्यांचा मृत्यु झाला असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ दरम्यान निदर्शनास येणे, राज्यात एकूण ५२९ शासकीय तर ५५६ आश्रमशाळा असणे, या आश्रम शाळांत ४, ४५, ४५२ विद्यार्थी शिकत असणे, यामध्ये मुलींची संख्या सुमारे २ लाख असणे, सन २००१ ते २०१६ या कालावधीत येथे एकूण १०७७ आदिवासी विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला असल्याचे शासनानेच नेमलेल्या डॉ.सुभाष साळुंखे समितीच्या अहवालातून उघड झाले असताना व मा.राज्यपालांनी सदर मृत्यु रोखण्याचे आदेश दिले असतानाही याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी आदिवासी समाजात पसरलेले तीव्र असंतोषाचे वातावरण यामुळे शासनाने सदर आश्रमशाळांतील मुलांना सुविधा उपलब्ध करुन देण्यासोबतच त्यांचे मृत्यु रोखण्याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. | **आदिवासी विकास** |
| ५४ | राज्यातील आदिवासी तीव्र कुपोषित बालकांना कुपोषणातून बाहेर काढण्यासाठी शासनाने ईझी नट पेस्ट पाकिट देण्याचा प्रस्ताव आणला असल्याचे माहे जून, २०१७ दरम्यान निदर्शनास येणे, हा प्रस्ताव म्हणजे मुलांपेक्षा कंत्राट कंपन्याचे पोषण करण्याचा शासनाचा डाव असल्याचा गंभीर आरोप सामाजिक संस्था/संघटना करीत असणे, यामुळे सरकारी निधीची उधळपट्टी होणार असणे, आहार तज्ञांच्या मतानुसार या पेस्टचा कुपोषित मुलांना फारसा उपयोग होणार नसणे, उलट हे पेस्ट त्यांच्या आरोग्यासाठी घातक ठरणारे असणे सामाजिक संस्थांच्या पोषण आहार गटाने केलेलया अभ्यासानुसार टीएचआर खाण्याचे प्रमाण हे केवळ ५ टक्के असणे उर्वरित ९५ टक्के टीएचआर हा फेकून दिला जात असणे किंव जनावरापुढे टाकला जात असल्याचे समोर आले | **महिला व बालविकास** |

| | | |
|---|---|---|
| | असतानाही शासन याकडे करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी आदिवासी समाजात पसरलेले तीव्र असंतोषाचे वातावरण म्हणून शासनाने बंद केलेली ग्राम बाल विकास केंद्रे पुन्हा सुरु करुन बचत गटांमार्फत कुपोषित मुलांना ताजा व सकस आहार देण्याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. | |
| ५५ | राज्य सरकार आणि आरोग्ययंत्रणा कुपोषणाच्या उच्याटनासाठी पाघलर जिल्ह्यासह राज्यात सक्षमपणे काम करीत असल्याचा दावा करण्यात येत असला तरी पालघरमधील विक्रमगड, जव्हार, वाडा आणि मोखाडा या आदिवासी तालुक्यांमध्ये तीव्र कुपोषणग्रस्त (मॅम) आणि अतितीव्र कुपोषणग्रस्त (सॅम) मुलांचे प्रमाण सर्वाधिक असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये टास्क फोर्सच्याच अहवालात समोर येणे, जागतिक आरोग्य संघटना आणि युनिसेफ यांच्या निर्देशकांनुसार मॅम आणि सॅममुळे शुन्य ते पाच वयोगटातील बालकांना मृत्युचा धोका १० पट अधिक असणे, गेल्यावर्षी पालघर जिल्ह्यात सर्वाधिक बालमृत्यूंची नोंद जुलै, ऑगस्ट आणि सप्टेंबर, २०१७ मध्ये झालेला असताना वर्षभरात यासाठी कोणतीही ठोस मोहीम राबविण्यात येत नसल्याने व राज्य शासन याकडे गांभिर्याने लक्ष घालीत नसल्यामुळे कुपोषणाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असून मोठया प्रमाणात बालम्रत्यूही होत असल्याने कुपोषणग्रस्त भागातील सर्वसामान्य जनतेत पसरलेले भितीचे व चिंतेचे वातावरण, याबाबत राज्य शासनाने तातडीने लक्ष घालून राज्यातील बालमृत्यु व कुपोषण रोखण्यासाठी प्रभावी यंत्रणा उभी करण्याची नितांत आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया. | **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण** |
| ५६ | शहापूर तालुक्यातील (जि.ठाणे) टाकीपठार प्राथमिक आरोग्य केंद्रात डॉक्टर व एकही आरोग्य कर्मचारी हजर नसल्याने अलका महेश मेंगाळ ही आदिवासी गरोदर महिला उपचाराविना प्रसूत होण्याचा प्रसंग घडल्याची धक्कादायक बाब माहे जून, २०१७ दरम्यान निदर्शनास येणे, या प्राथमिक आरोग्य केंद्रात डॉक्टर व एकही कर्मचारी नसल्यामुळे , गरोदर महिला, विंचू, सर्पदंश झालेल्या रुग्णांचे होत असलेली मोठी गैरसोय, वेळेवर उपचार मिळत नसल्याने अनेकदा रुग्ण दगावणे, त्यामुळे ढाढरे येथील आदिवासी महिला सरपंचानी आंदोलनाचा इशारा दिला असतानाही शासन करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, शासनाने सदर प्राथमिक आरोग्य केंद्रात पूर्ण वेळ वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी नियुक्त करण्याबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. | **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण** |
| ५७ | नाशिक जिल्ह्यात ब्रिटीशकालीन व ज्या पुलांचा सुरक्षेचा कालावधी संपला आहे, अशा धोकादायक पुलांची संख्या अधिक असणे, नाशिक येथिल कन्नमवार (व्हिक्टोरिया), लोहनेर ठेंगोडा, ता.बागलाण (जि.नाशिक) येथिल गिरणा, सायखेडा, ता.निफाड (जि.नाशिक) येथिल गोदावरी नदीवरील पुल, घोटी-सिन्नर मार्गावरील देवळेगांवाजवळील दारणा नदीवरील पुल, ओझर येथिल बानगंगा नदीवरील पुल इत्यादी अनेक पुलांची अवस्था अत्यंत वाईट असणे, यापैकी असलेल्या अनेक पुलांवर ते वाहतुकीस धोकादायक असल्याने संबंधित विभागाने प्रवेश वर्जित व सावधानतेचे फलक लावलेले असणे, याउपर कमजोर व धोकादायक पुलांवरून सर्रास अवजड वाहतुक बिनभोबाट सुरु असणे, घोटी-सिन्नर मार्गावरील दारणा नदीवरील गेल्या अनेक वर्षापासून धोकादायक असलेल्या पुलाचा वापर सुरु असणे, यापुलासाठी सहा महिन्यापुर्वी केलेली लाखोची डागडुजी कुचकामी ठरणे, डागडुजीचे कामावर ४७ लाख रुपयांचा खर्च करण्यात येवूनही हे काम अर्धवटच असल्याचे दिनांक : ७ जुलै, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, दरम्यान वाहतुकीस धोकादायक असलेल्या व दोन वेळा स्ट्रक्चरल ऑडीट झालेल्या दारणा नदीवरील कमकुवत पुलास दिनांक : १४ जुलै, २०१७ रोजी रात्रीच्या सुमारास दुरूस्तीचे प्रस्तावित काम सुरु होण्यापुर्वीच मध्यभागी मोठे भगदाड पडणे, तद्नंतर या धोकेदायक पुलावरील वाहतुक बंद केली जाणे, दरम्यान जिल्ह्यातील जुन्या आणि धोकादायक असलेल्या पुलांचे देखभाल दुरूस्तीसाठी सदरील पुलावरून अवजड वाहतुक बंद केल्याचे निदर्शनास येणे, त्यात दारणा नदीवरील दोन पुल, गोदावरील एक पुल, पांधण नदीवरील एक पुल आणि दोन नाले यांचा समावेश असणे, तरी, अद्यापही या धोकादायक व कमजोर पुलांवरून अन्य | **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून)** |

| | | |
|---|---|---|
| | वाहतुक सुरुच असणे, दरम्यान, जिल्ह्यातील कमकुवत पुलांची माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाने तब्बल वर्षभरानंतरही जिल्हा प्रशासनास सादर न करणे, त्यामुळे मा.जिल्हाधिकारी, नाशिक यांनी प्रस्तुत विभागास अल्टीमेटम दिल्याचे दिनांक : ३१ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, महाड येथिल पुल दुर्घटनेच्या पार्श्वभुमीवर सर्वच जुन्या पुलांचे स्ट्रक्चरल ऑडीट पुर्ण करून धोकादायक व कमजोर पुलांवरील सर्वच प्रकारची वाहतुक बंद करणेसंदर्भात मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिनांक : ३१ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास मुंबई येथे आढावा बैठकीत आदेश देणे, सामाजिक संस्था व कार्यकर्त्यांकडूनही याबाबतची मागणी केली जाणे, तरी संबंधित विभागाचे याकडे दुर्लक्ष होणे, यामुळे जनतेत नाराजी व संतापाची भावना असणे, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. | |
| ५८ | मालेगांव (जि.नाशिक) शहर हद्दीलगत व तालुक्यात गिरणा नदी पात्रातून अनधिकृत - बेकायदा होणारा अमर्याद वाळूचा उपसा रोखण्याकरिता मालेगांव तालुक्यात गौण खनिजाचे अवैध उत्खनन / वाहतुकीस प्रतिबंध करण्यासाठी मंडळ निहाय १० भरारी पथकांची नेमणुक केलेली असणे, तरीही सर्रास अवैध वाळू उपसा होत असल्याचे निदर्शनास येणे, मागील सहा महिन्यात या पथकांनी वाळू चोरांविरुध्द केवळ १० कारवाया केल्या असल्याचे दिनांक १२ जुलै, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, गिरणा नदी पात्रातून दिवसा ढवळ्या हजारो ब्रास वाळूचा उपसा सुरु असल्याचेही निदर्शनास येणे, चंदनपुरी शिवारात (ता.मालेगांव, जि.नाशिक) दिनांक ८ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टर ट्रॉलीने ऍपेरिक्षाला धडक दिल्याने झालेल्या अपघातात रिक्षातील एका १४ वर्षाच्या शाळकरी विद्यार्थ्याचा मृत्यु होणे, गिरणा नदी पात्रात वाळू उपसामुळे मोठ-मोठे खड्डे पडून पात्राच्या खोलीत वाढ होवून पाण्याचा अंदाज न आल्याने मागील कालावधीत अनेक तरूणांचा पाण्यात बुडून मृत्यू होणे, वाळू चोरीमुळे शासनाच्या मोठ्या महसूलाचे नुकसान होणे, गिरणा पुलाजवळून दररोज अनेक बैलगाड्यांमधून वाळू सर्रास वाहून नेली जात असल्याचे दिसून येणे, वाळू चोरीला आळा घालण्यासाठी स्थानिक महसूल प्रशासनाकडून कठोर, सक्तीची व ठोस कारवाई होत नसल्यामुळे वाळू चोर निर्ढावणे व वाळूची खुलेआम विक्री होत असल्याचे दिसून येणे, या पार्श्वभुमीवर शासनाने तात्काळ कठोर, प्रतिबंधात्मक कारवाई करण्याची आवश्यकता. | **महसूल** |
| ५९ | मुंबई वांद्रे टर्मिनस जवळील मुंबईला पाणीपुरवठा करणारी ७२ इंच व्यासाची जलवाहिनी फुटल्याने सदर पाण्याच्या प्रवाहाबरोबर घराच्या समोर खेळत असलेली लहान बहिण भांवडे पाण्याच्या प्रवाहात वाहून जाऊन त्यांचा मृत्यु होणे, तसेच पाण्याचा प्रवाह मोठा असल्याने बेहराम पाडयातील झोपडीत पाणी शिरुन मोठया प्रमाणात झोपडीधारकांचे नुकसान होणे, अचानकरित्या नैसर्गिक कारणाने जलवाहिनी फुटून बेहराम पाडयातील झोपडीधारकांचे मोठया प्रमाणात नुकसान होणे, याबाबत मुंबई बांद्रा टर्मिनस येथील फुटलेल्या जलवाहिनीमुळे झोपडीधारकांचे नुकसान झाल्याबाबत चौकशी करुन झोपडीधारकांना आर्थिक मदत देण्याची तसेच सदर जलवाहिनी फुटून पाण्याच्या प्रवाहात वाहून मृत झालेल्या बालकांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करण्यांत येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. | **नगर विकास** |
| ६० | मुंबई व परिसरात 'शिफू सन-कृती' च्या विळख्यात तरुण-तरुणी गुरफटत असल्याची धक्कादायक बाब निदर्शनास येणे, शिफू सन-कृती या नावाने संकेतस्थळ उपलब्ध असणे, त्यावर लैंगिक बाबी विषयक आक्षेपार्ह माहिती देण्यात येणे, माहे एप्रिल, २०१७ मध्ये समाज विघातक शिफू सन-कृती चा प्रसार करणारा बोगस डॉक्टर सुनिल कुलकर्णी याला मुंबई गुन्हा शाखेने अटक करणे, शिफू सन-कृती संस्कृतीच्या माध्यमातून वेश्या व्यवसाय व अंमली पदार्थ तस्करीची प्रकरणे समोर येणे, या प्रकरणी गंभीरपणे तपास होत नसल्याचा याचिकेवर मा. उच्च न्यायालयाने पोलिसांवर ताशेरे ओढून अनेक सूचना करणे, पोलीस तपासात समोर आलेली माहिती धक्कादायक असल्याची टिप्पणी मा. उच्च न्यायालयाने सदर प्रकरणीच्या सुनावणीच्या वेळी करणे, या धक्कादायक बाबी पोलीस तपासात उघड झाल्या आहेत त्याचा गांभिर्याने तपास करण्याची गरज असल्याचेही मा. उच्च न्यायालयाने सांगणे, हे प्रकरण | **गृह** |

| | | |
|---|---|---|
| | अतिशय गंभीरपणे घेवून या प्रकरणाचा मुळाशी जाण्याची गरज असणे, याबाबत नागरिकांमध्ये वाढलेली चीड व संतापाची लाट, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. | |
| ६१ | नभुक्र ६२९ (भाग) वांद्रे व्हिलेज, खेरवाडी वांद्रे (पूर्व) येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजने अंतर्गत कनाकिया पॅरिस या विकासकाकडून विकसीत करण्यात येत असलेल्या महाराष्ट्र नगर को ऑ.हौ.सोसायटी अंतर्गत सागरी हद्द नियंत्रण कायद्याचे उल्लंघन करुन विकासकाने बांधकाम केल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ वा त्या सुमारास उघडकीस येणे, या योजनेत मिठी नदीची रुंदी कमी करुन विकासकाने बांधकाम केलेले असल्याने अतिवृष्टी झाल्यास वाकोला नाला व मीठी नदी परिसरातील झोपड्यांना धोका निर्माण झालेला असणे, विक्री इमारतीचे बांधकाम करताना सी.आर.झेड. नियमाचे झालेले उल्लंघन, अनधिकृतपणे करण्यात आलेली झाडांची कत्तल मा. लोक आयुक्तांकडे करण्यात आलेली तक्रार, त्यानुषंगाने कार्यवाही करणेबाबत एस.आर.ए. ला दिलेले निर्देश नाल्याची रुंदी कमी केल्याचे, इमारतीचे बांधकाम सी.आर.झेड क्षेत्रात झाल्याचे एस.आर.ए. च्या तपासात निष्पन्न होणे, यामध्ये पर्यावरण कायद्याचे उल्लंघन, संबंधीत विभागाकडून कोणतीही परवानगी न घेता करण्यात आलेले बांधकाम, अशाप्रकारचे अतिक्रमण २६.७.२००५ सारखी पुरपरिस्थिती निर्माण करणारे तसेच परिसरातील नागरीकांच्या जिवितास धोका निर्माण होण्याची शक्यता असणे, नदीच्या दोन्ही बाजूंनी १२० मीटर चे अंतर ठेवणे, नियमानुसार बंधनकारक असणे, या परिसरातील कांदळवणाची विकासकाने कत्तल केलेली असणे, या सर्व बाबी विचारात घेवून एस.आर.ए. कडून काम थांबविण्याबाबत नोटीस पाठविण्यात येणे, याविरुध्द न्यायालयात जावून विकासकाने २ आठवड्याची स्थगिती मिळवणे, यानंतर विकासकाविरुध्द कोणतीही कार्यवाही करण्यात न येणे, यामध्ये शासनाने हस्तक्षेप करुन प्रकल्प थांबविण्याची आवश्यकता, नागरीकांच्या जिवितास निर्माण झालेला धोका, शासनाने याबाबत करावयाची कारवाई व उपाययोजना. | **गृहनिर्माण** |
| ६२ | राज्यातील आदिवासी आश्रम शाळांमधील पावणे दोन लाख विद्यार्थ्यांसाठी सन २०१६-१७ या वर्षासाठी खरेदी करण्यात आलेल्या रेणकोट मध्ये कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार झाला असल्याची गंभीर बाब माहे जुलै, २०१७ मध्ये वा त्या सुमारास उघडकीस येणे, ५४१ आश्रम शाळांमधील पावणे दोन लाख विद्यार्थ्यांसाठी खरेदी करण्यात आलेल्या रेनकोटच्या किंमती प्रकल्पनिहाय वेगवेगळ्या असणे, या किंमतींमध्ये तब्बल प्रत्येकी ३५० रुपये इतकी तफावत आढळून येणे, नाशिकच्या कळवण या दुर्गम तालुक्यात एका रेनकोटची किंमत १७९ रुपये ठरवून त्याप्रमाणे पुरवठा झाला असतांना नाशिक प्रकल्पात तोच रेणकोट ४९७ रुपयांना खरेदी करण्यात येणे, अनेक प्रकल्पनिहाय याच्या किंमती ४८० ते ४९९ रुपयांपर्यंत असणे, मे. हुसेन ट्रेडर्स, मे. सुपर प्लास्टीक कॉर्पोरेशन मे. लकी प्लास्टीक, मुंबई या कंपन्यांकडून ३ कोटी रुपयांचे रेणकोट प्रचंड दर देऊन खरेदी करुन भ्रष्टाचार करणे, कळवण प्रकल्पात १९ हजार विद्यार्थ्यांना ३५ लाखात पुरवठा झाला असतांना नाशिक प्रकल्पात १७ हजार विद्यार्थ्यांसाठी ८५ लाख रुपयांचा खर्च येणे, राज्यभरातील २९ ही प्रकल्प कार्यालयांमध्ये पुरवठ्यात अशीच तफावत आढळून येणे, सदर रेणकोट नमुण्यांची तपासणीही फार्मासिटीकल प्रॉडक्ट तपासणीसाठी म्हणजे औषधांची तपासणी करणाऱ्या पॅरालॅब प्रा.लि. या कंपनीकडून करण्यात येणे, गुणवत्ता नसतांनाही लॅबने रेनकोट प्रमाणित करणे, सदर खरेदी ही आयुक्त कार्यालय, मंत्रालय स्तरावर झालेली असल्याने यात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाला असणे, या रेनकोट खरेदीची स्वतंत्रपणे चौकशी करुन दोषींवर निलंबनाची कारवाई करण्याची आवश्यकता, खरेदीतील तफावती ही चौकशी सर्वात कमी दराने झालेल्या खरेदीप्रमाणे सर्व खरेदी प्रक्रिया करणे, जादा अदा करण्यात आलेल्या रकमेची वसुली करण्याची आवश्यकता व या संपुर्ण प्रकरणाची लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी करण्याची नित्तांत गरज, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व भुमिका. | **आदिवासी विकास** |

| | | |
|---|---|---|
| ६३ | न.भु.क्र. १७७८, १७७४, १७७५ भायखळा विभाग येथील भुखंडावर मे. फेबर्स कन्स्ट्रक्शन या विकासकाकडून वि.नि.नि. ३३(७) खाली पुनर्विकास योजना राबवण्यात येत असणे, सदर भुखंड हा भायखळा कारागृहानजिक असल्याने या भुखंडावरील पुनर्विकासाकरीता कारागृह प्रशासनाचे व या संदर्भात नेमण्यात आलेल्या स्थायी सल्लागार समितीकडून नाहरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक असणे, परंतु या भुखंडावरील भुखंड क्र. १७७४ वरील प्रस्ताव हा ४.१२.२०१३ रोजी दाखल करण्यात आला असतांनाही व यासाठी नाहरकत प्रमाणपत्राची आवश्यकता असतांनाही विकासकाने कसलीही परवानगी न घेता गृह विभागाच्या आदेशास बगल देवून न.भु.क्र. १७७४ चा भुखंडावर पुनर्विकास केलेला असणे, या बाबी न तपासता महानगर पालिकेकडून I.O.D. व C.C. निर्गमित करण्यात आल्याने संबंधित अधिकाऱ्यांच्या चौकशीची असलेली आवश्यकता, मंजूर आराखड्यात किमान १,००० चौ.फु. चे मनोरंजन उद्यानाची तरतूद असतांना विकासकाकडून याकरीता फक्त १०० चौ.फु. जागा सोडण्यात येणे, मंजूर आराखड्यातील तरतूदीप्रमाणे बांधकाम न करण्यात येणे, अत्यावश्यक असलेल्या जागेवर बांधकाम करुन विक्री करण्यात येणे, विकासकाकडून नियमातील तरतुदींचा भंग करण्यात येणे, महानगर पालिकेतील अधिकाऱ्यांनी याकडे जाणीवपूर्वक केलेले दुर्लक्ष, यामध्ये शासनाचे व रहिवाशांचे झालेले नुकसान, विकासकावर व संबंधित महानगर पालिका अधिकारी तसेच वास्तुरचनाकार यांचेवर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. | **नगर विकास** |
| ६४ | कोणत्याही विभागाचे कंत्राट हे निविदा काढूनच देण्याबाबतचा स्पष्ट शासन निर्णय असतांना सुध्दा सामाजिक न्याय विभागांतर्गत येणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांची वसतीगृहे निवासी शाळा आणि सामाजिक न्याय भवनाची साफसफाई, माळीकाम, सुरक्षा आणि वीज देखभालीचे शंभर कोटी रुपयाहून अधिकचे कंत्राट कोणतीही निविदा न काढता देण्यात येणे, सन २०१३ मध्ये सदर कंपन्यांची नियुक्ती ३ वर्षाकरीता करण्यात येणे, तेव्हाच्या शासन निर्णयामध्ये बाह्य स्त्रोताव्दारे करावयाचा कामाचा कालावधी ३ वर्षाचा निश्चित केलेला असणे, कंपनीचे काम समाधानकारक वाटल्यासच शासनाची मान्यता घेवून एक वर्षाची मुदतवाढ देण्याची तरतूद मूळ शासन निर्णयात असणे, सदर कंत्राटदार कंपन्यांच्या कामाबाबत अक्षम्य त्रुटी असल्याचे विभागाला कळवून संबंधितांना कारणे दाखवा नोटीस बजावण्याबाबत विद्यमान मंत्री, सामाजिक न्याय यांचेकडून सुचित करण्यात येणे, कंत्राटदाराची मुदत सप्टेंबर, २०१७ मध्ये संपणार असल्याचे माहिती असतांना सुध्दा नविन निविदा काढण्याची प्रक्रिया सुरुवात करण्याबाबतची नस्ती विभागाकडून सादर करण्यात येवूनही एप्रिल, २०१७ पर्यंत मंत्री, सामाजिक न्याय यांचे कार्यालयात नस्ती प्रलंबित ठेवणे, ज्या मंत्री महोदयांनी सदर कंपनीला कारणे दाखवा नोटीस जारी केली, कंपनीच्या कामातील त्रुटीबाबत गंभीर मुद्दे विभागाकडे उपस्थित केले त्याच मंत्री महोदयांनी सदर कंपनीला निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत मुदतवाढ देण्याचे आदेश पारीत करणे, यामध्ये निश्चितपणे गैरव्यवहार झाल्याची शक्यता असणे, याबाबत विशेष चौकशी नेमण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. | **सामाजिक न्याय** |
| ६५ | रत्नागिरी जिल्हयातील खेड, दापोली आणि मंडणगड तालुक्यात हाती घेण्यात आलेल्या जलयुक्त शिवार योजनेतील ५५८ कामांमध्ये १० कोटी रूपयांचा भ्रष्टाचार झाल्याची मा. मुख्यमंज्याकडे अलिकडेच करण्यात आलेली लेखी तक्रार, सदरहू तक्रारीनुषंगाने मा. मुख्यमंज्यानी जून २०१७ च्या पहिल्या आठवडयात रत्नागिरी येथील एससीबी कार्यालयाला दिलेले आदेश, सदरहू भ्रष्टाचाराची चौकशी करून संबंधित दोषीविरोधात कारवाई करण्यास होत असलेली दिरंगाई तसेच भ्रष्टचार करणा-या दोषींना पाठिशी घालण्याचा होत असलेला प्रकार, सदरहू तालुक्यातील शेतक-यांमध्ये शासनाच्या भूमिकेबाबत निर्माण झालेले संशयाचे वातावरण, याप्रकरणी विनाविलंब सखोल चौकशी होवून संबंधित दोषीविरोधात ठोस कारवाई करण्याची आवश्यकता, याप्रकरणी शासनाने केलेली कारवाई, करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. | **गृह** |

| | | |
|---|---|---|
| ६६ | वाडा हे पालघर जिल्ह्याचे मध्यवर्ती ठिकाण असल्याने जिल्ह्याच्या सर्व भागांतील रुग्ण उपचारासाठी वाडा ग्रामीण रुग्णालयात येत असणे, पावसाळ्यात प्रतिदिन ३०० ते ३५० बाह्यरुग्ण तर ३० ते ४० आंतररुग्णांची तपासणी करून उपचार केले जात असणे, त्यातच रात्यावरील अपघातांसह इतर घटनांचे १० ते १५ रुग्ण येत असून, सर्पदंश, विंचूदंश सारख्या रुग्णांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत असताना, महिन्याला ९० ते १०० प्रसूती होत असणे, मात्र स्त्रीरोगतज्ज्ञ, भूलतज्ञांची या ठिकाणी कमतरता असल्याने गुंतागुंतीच्या प्रसूतीसाठी महिलांना अनकेदा मुंबई, ठाणे येथे पाठवण्यात येत असणे, रुग्णालयातील वैद्यकीय अधीक्षक हे पद मागील दोन वर्षापासून रिक्त असून दोन वैद्यकीय अधिका-यांची पदेही दोन वर्षांपासून रिक्त असल्याने एकाच अधिका-यावर कामाचा सातत्याने ताण येत असणे, मा. आरोग्य मंत्र्यांच्या पाहणीवेळी नागरीम्व सामाजिक कार्यकर्त्यांनी रुग्णालयातील रिक्त पदांची तातडी लक्षात आणून दिलेली असतानाही वाडा रुग्णालयातील असुविधा व रिक्त पदांची समस्या दूर करण्यात शासनास आलेले अपयश,त्यामुळे नागरिकांमध्ये पसरलेले संतापाचे वातावरण, सबब वाडा रुग्णालयातील गरीब व दुर्गम भागातील रुग्णांना चांगल्या आरोग्य सुविधा मिळण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची ठोस कार्यवाही, केलेली कारवाई व शासनाची प्रतिक्रिया. | **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण** |
| ६७ | कल्याण-डोंबिवली महानगरपालिकांतर्गत असलेली कल्याण शहरातील वाहतूक कोंडी कमी व्हावी म्हणून अवजड वाहनांसाठी गोंविदवाडी बायपास रस्ता बनविण्याचा प्रस्ताव २००१ मध्ये मंजूर झाल्यानंतर पत्रीपूल ते दुर्गाडी किल्ला असा १०० फूट रूंद व सुमारे दीड किलोमीटर लांबीचा रस्ता तयार करण्यासाठी तब्बल ७४७ कुंटूंबाची घरे तोडण्यात आलेली असतानाही आजमितीस तब्बल १६ वर्षे होवूनही १४६ कुंटूंबियांना बीएसयुपीची सदनिका मिळालेलीच नसणे त्यातच कल्याण-डोंबिवली महानगर प्रशासनाने विस्तापीताचे पुनर्वसन करताना मूळ लाभार्थ्यांना वगळून ५५ जणांना बीएसयुपीची घरे दिल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस येणे, बायोमेट्रिक सर्व्हे न करताच बीएसयुपीच्या यादीमध्ये बोगस नावे घुसवून केलेला गैरव्यवहार व गैरप्रकार, या प्रश्नांवरून दि. २० जून २०१७ रोजी महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत काही नगरसेवकांनी वाचा फोडल्यानंतर महापौरांनी या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधितांविरोधात ठोस कारवाई तसेच बाधित झालेल्या उर्वरित सर्व १४६ कुटूंबियांना तातडीने घरे देण्यासाठी १ महिन्यांच्या आत पुनर्वसन धोरण ठरविण्याबाबत दिलेले आदेश, अद्यापी या प्रकरणी चौकशी होवून संबंधित दोषीविरोधात कारवाई करण्यास होत असलेली दिरंगाई व टाळाटाळ, यामुळे विस्तापीत झालेल्या कुटूंबियांमध्ये निर्माण झालेले संतापाचे वातावरण,शासनाने याप्रकरणी विनाविलंब ठोस कारवाई करण्याची आवश्यकता, याप्रकरणी शासनाने केलेली कारवाई, करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. | **नगर विकास** |
| ६८ | वसई-विरार या एका राजकीय पक्षाचे जिल्हा अध्यक्ष श्री.सुभाष वसंतराव साटम यांनी खोटे व बनावट दस्तऐवज बनवून मयत पत्नी श्रीमती सुवर्णा सुभाष साटम यांचे दि. २८/४/२०१३ रोजी मयत झाली असता, मयत पत्नीच्या जागी दुसरी पत्नी उभी करुन रामभाऊ म्हाळंगी सहकारी पतसंस्थेत खोटेदस्तऐवज दाखवून लाखो रुपयांचा केलेला गैरव्यवहार तसेच एकाच पत्नीचे दोनवेळा मृत्युचा दाखल बेकायदेशीरपणे नोंदविणे, त्याचप्रमाणे वसई-३ चे रजिस्ट्रार यांनी मौजे आचोळे येथील सर्व्हे क्र. १४६ या मिळकतीविरुध्द अंबिका अपार्टमेंट या इमारतीतील गाळा क्र. ९ हा त्यांची पत्नी सुवर्णा साटम यांच्या नावे असलेला गाळा रामभाऊ म्हाळंगी सहकारी पतसंस्थेला भाडेतत्वावर देऊन त्याबाबत शासकीय बाजारमुल्य कमी दाखवून मुद्रांकशुल्क वाचविण्यासाठी गैरमार्गाने सहकार्य करणे, त्यामुळे शासनाचे झालेले प्रचंड आर्थिक नुकसान, तसेच खोटे व बनावट मृत्यु प्रमाणपत्र तयार करणारे वसई-विरार शहर महानगरपालिकमेचे अधिकारी यामध्ये सहभागी असणे, याबाबत गैरकारभारा प्रकरणी रजिस्ट्रार तसेच महानगरपालिकेचे अधिकारी यांचीही चौकशी होण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाची भूमिका व शासनाची प्रतिक्रिया. | **गृह** |

| | | |
|---|---|---|
| ६९ | महाड तालुक्यातील (जि.रायगड) दाभोळ,वराठी, गोमेंडी, कोकरे, टोळ, दासगांव, काफीळा बंदर, ताडवाडी, बौध्दवाडी या सावित्री नदीच्या भागामध्ये अनधिकृतपणे सेक्शन पंपाद्वारे वाळूचा बेकायदेशीर उपसा वाळूमाफियांच्या माध्यमातून मोठयाप्रमाणात राजरोसपणे होत असणे, सक्शन पंपाला मा.उच्च न्यायालयाची बंदी असताना तसेच हातपाटीची परवानगी असताना स्थानिक महसूल प्रशासनाच्या आशिर्वादाने सक्शन पंपाद्वारे वाळू उपसा चालू असणे, सक्शन पंपामुळे शेतकऱ्यांची आजूबाजूची शेतीही मोठया प्रमाणात उध्दवस्त होत असणे, तसेच काढलेला रेजगा रस्त्याच्याकडेला टाकल्यामुळे सतत वाहनांना अपघात होत असणे, वाळू उपसामुळे शासनाचे करोडो रुपयांचे होत असलेले प्रचंड नुकसान, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी तसेच तेथील जनतेनी वारंवार स्थानिक जिल्हा प्रशासनाकडे तक्रारी करुनही कोणतीच दखल वा कारवाई न करणे, त्यामुळे जनमाणसांत पसरलेले कमालीचे संतापाचे वातावरण, याबाबत शासनाची भूमिका व शासनाची प्रतिक्रिया. | **महसूल** |
| ७० | रायगड जिल्हयातील मुरुड-जंजिरा नगरपरिषदेत सन २०११ पासून अनेक गैरप्रकार व शासकीय निधीचा होत असलेला अपहार न केलेल्या कामांची बीले अदा करण्यात आलेली बाब नुकतीच उघडकीस येणे, रस्ते कामामध्ये नियमाप्रमाणे खोदाई न करता ९०० ते ९५० ट्रक खडी-माती काढल्याचे दाखवून यावर एकंदर २८ लाखांपेक्षा जास्त रक्कम काम न करता उचलण्यात येणे, एम.बी. वर मुख्याधिकारी यांची स्वाक्षरी नसताना देखील बिले अदा करण्यात आलेली असणे, तसेच एम.बी. पुस्तिकेमधील मापांमध्ये अनियमितता स्पष्ट दिसत असणे, नळपाईप लाईनचे काम जीवन प्राधिकरण यांचेमार्फत झालेले असताना व त्यांचे पैसे जीवन प्राधिकरणाने दिले असतानाही, नगरपरिषदेमार्फत १७ लाखांचे बील काढण्यात आलेले असणे, दुसरी गंभीर बाब म्हणजे साडेतीन कि.मी. पाईपलाईन व डिझेलपंप सुस्थितीत असतानाही ते भंगारात विकण्यात येणे, त्यामुळे शासकीय निधीचा करोडो रुपयांचा अपहार होणे, याबाबत तेथील नगरसेवकांनी शासनस्तरावर तक्रारी करुनसुध्दा अद्यापी कोणतीच कारवाई न होणे, त्यामुळे जनमानसात पसरलेले कमालीचे संतापाचे वातावरण, याबाबत शासनाची भूमिका व शासनाची प्रतिक्रिया. | **नगर विकास** |
| ७१ | उल्हासनगर ( जि. ठाणे) शहराच्या मध्यवर्ती भागातून वाहणाऱ्या वालधुनी नदीपात्रात रविवार दि. २५ जून, रोजी रात्री दहा वाजण्याच्या सुमारास लालचक्की परिसरात हवेतून अचानक विषारी दर्प येउ लागल्याने नागरिकांना श्वासोच्छवास घेण्यास त्रास होऊ लागला, थोड्याच वेळात हा विषारी वायू हवेत पसरून उल्हासनगरातील सुभाष टेकडी, रामनगर, हिराघाट, ओटी सेक्शन, फर्स्ट गेट, सम्राट अशोक नगर या परिसरातील नागरिकांना त्याचा त्रास जाणवू लागल्याने नागरिकांना उलट्या, डोकेदुखी, मळमळणे असे त्रास जाणवू लागले तर अनेक गरोदर महिलांचे चेहरे लालबुंद होणे अशा प्रकारामुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरल्याने या भागातील जागरूक नागरिकांनी तत्काळ विठ्ठलवाडी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केल्यानंतर पोलीस व उल्हासनगर महानगरपालिकेच्या आपत्कालीन पथकाचे कर्मचारी यांनी वालधुनी नदी पात्राची पाहणी केली असता त्यावेळी नदीपात्रात पांढ-या रंगाचा फेस व निळसर रंगाचे केमिकल पाण्यासोबत वाहत येत असल्याचे स्पष्ट दिसून येणे मात्र कालांतराने पावसाचा जोर वाढल्याने वायूची तीव्रता कमी होऊन नागरिकांना दिलास मिळाला असला तरी या नदीपात्रात विषारी द्रव्य मिसळले असल्याचे स्पष्ट झालेले असल्याने व यापूर्वीही असे प्रकार अनेकदा घडलेले असल्याने नागरिकांच्या आरोग्याचा विचार करता, या प्रकरणाची गंभीर दखल घेउन रासायनिक द्रव्ये नदीपात्रात सोडणा-यांचा शोध घेऊन या दोषींविरोधात शासनाने तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता, याप्रकरणी शासनाने केलेली कारवाई, करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. | **गृह** |
| ७२ | मुंबई विमानतळाजवळ उंचीची मर्यादा ओलांडून कोणत्याही एन.ओ.सी विना विकासकांकडून अनधिकृत बांधकाम केलेले असणे, सदर प्रकरणात वास्तूविशारद श्री. तेजस शहा मेसर्स स्केअर्स कन्संल्टट हे वास्तूविशारद असलेल्या बहूतांश इमारती या भारतीय विमानतळ प्राधिकरणाने दिलेल्या उंची | **नगर विकास** |

| | | |
|---|---|---|
| | पेक्षा जास्त असणे, वास्तूविशारद श्री.तेजश शहा यांचा परवाना महानगरपालिकेकडून रद्द केलेला असणे, परंतू श्री.तेजस शहा वास्तूविशारद असलेल्या प्रकल्पांच्या विकासकांनी विमानतळ प्राधिकरणाने दिलेल्या उंची पेक्षा जास्त बांधकाम केलेल्या या विकासंकांवर महानगरपालिकेतील इमारत प्रस्ताव विभाग व वॉर्डातील इमारत बांधकाम विभाग यांच्या कडून कोणतीही कारवाई केलेली नसणे, तसेच या प्रकरणात महानगरपालिकेतील दोषी अभियंत्यावर देखील महानगरपालिकेडून कार्यवाही करण्यास दिरंगाई केली जात असणे, यामुळे नागरीकांमध्ये तीव्र असंतोष मात्र त्याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कारवाई व प्रतिक्रिया. | |
| **७३** | भारतात रिझर्व्ह बँकेने बंदी घातलेल्या बिट क्वाईन ह्या व्हॅचुअल करन्सीची खरेदी विक्री करून त्याद्वारे नाशिक येथे मल्टीलेव्हल मार्केटिंग करून नागरिकांना भविष्यात मोठ्या रकमेचा परतावा देण्याचे अमिष दाखविणाऱ्या सहा जणांच्या टोळीचा नाशिक सायबर पोलिसांनी पर्दाफाश करत सहा जणांना जेरबंद केल्याचे दिनांक २० मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, यामुळे फसवणुकीचा मोठा गोरखधंदा समोर येणे, याचलनाचे मुळात अस्तित्वच नसणे, मात्र, इंटरनेटवर त्याचा पैसा म्हणून वापर केला जाणे, भारतात या चलनावर बंदी असून त्याचा वापर प्रतिबंधित असणे, याउपर बंदी असलेल्या चलनाबाबत व्यवहार होत असल्याची माहिती नाशिक सायबर पोलिसांना मिळणे, त्यानुसार पोलिसांनी मुंबई हायवे आग्रा महामार्गावरील एक हॉटेलजवळ छापा मारून बिट क्वाईनद्वारे फसवणुक करणाऱ्या सहा लोकांना जलद कारवाई करत अटक करणे, भारतात बिट क्वाईन चलनास कायदेशिर मान्यता नसल्याने देशातील हा पहिलाच गुन्हा नाशिकमध्ये दाखल झाल्याचे सांगितले जाणे, ऑनलाईन व्यवहारामध्ये परदेशी नागरिकांकडून अवैध व्यवसाय-व्यवहारात बिट क्वाईनचा वापर केला जाणे, समाज विघातक प्रवृत्ती व घटनांना यातुन चालना मिळणे आणि व्यापक सामाजिक हानी होण्याची संभावना असणे, म्हणून पोलिसांनी यासर्व प्रकाराची सखोल व कठोर चौकशी करून या फसवणुकीच्या गोरख धंद्याची राज्य व देशांतर्गत पाळेमुळे खणून काढण्याची गरज आणि कटात सहभागी झालेल्यांचा शोध घेवून कारवाई करण्याची आवश्यकता यागुन्ह्याची मोठी असलेली व्याप्ती विचारात घेता शासनाने सखोल चौकशी व तात्काळ कारवाई करावी, म्हणून केली जाणारी मागणी, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. | **गृह** |
| **७४** | राज्यात मागील ५ वर्षात वीजेचे दरात जवळजवळ दुप्पट वाढ झाल्याचे दिनांक : ४ जुलै, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, सर्वसामान्य वीज ग्राहकांना वीज बिलाच्या वाढीव ओझ्यामुळे मोठ्या प्रमाणावरील आर्थिक तोषिसीचा सामना करावा लागणे, वीज दरांबरोबर मीटर शुल्कही दुप्पट केल्याचे निदर्शनास येणे, यासोबतच विद्युत शुल्कामध्ये एक टक्का वाढ करणे, यासर्वांचा परिणाम वीज बिलावर होणे, वाढीव वीज बिलामुळे सर्वसामान्य वीज ग्राहक पुरते हैराण होणे, वेळोवेळी झालेल्या वीज दर वाढीचा बोजा वीज ग्राहकांच्या वीज बिलावर पडणे, मे, २०१७ मध्ये झालेल्या वीज बिल वाढीमुळे सर्वसामान्य वीज ग्राहकांना मोठा आर्थिक फटका बसणे, महावितरणने विद्युत नियामक आयोगाच्या आदेशानुसार बहुवार्षिक वीज दर लागू करणे, तरी, इंधन समायोजन आकारामुळे वीज ग्राहकांच्या वीज बिलात सरसकट २० टक्क्यांची वाढ होणे, वीज दर वाढीचा हा अतिरिक्त बोजा शासनाने कमी करून वीज ग्राहकांना दिलासा देण्याची गरज, शासनाकडून घरगुती ग्राहकांकडून १६ टक्के दराने तर व्यावसायिक ग्राहकांकडून २१ टक्के दराने विद्युत शुल्क वसुल केले जाणे, हे शुल्क एकूण वीज बिलावर वसुल केले जाणे, मे, २०१७ च्या वीज बिलात २ टक्के विद्युत दर तसेच १८ टक्के इंधन अधिभार शुल्क लावण्यात आल्याने विद्युत शुल्कात वाढ होणे, परिणामी वीज ग्राहकांच्या वीज बिलांवरील एकत्रित भार २३ टक्क्यांपर्यंत वाढणे, दरम्यान, राज्यातील खाजगी अनुदानित शाळा - महाविद्यालयांना व्यावसायिक ऐवजी घरगुती दराने वीज बिलाची आकारणी करण्याची मागणी केली जाणे, वीज दरात सवलत देवून ग्राहकांना दिलासा देण्याची गरज, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. | **ऊर्जा** |

| | | |
|---|---|---|
| ७५ | नाशिक जिल्ह्यात, विविध संरक्षित वन संवर्धन क्षेत्रात हरीण, काळविट, मोर व अन्य वन्य प्राण्यांच्या अनधिकृतरित्या शिकारीच्या घटनात वाढ होणे, जून व जुलै, २०१७ या महिन्यात दोन वेगवेगळ्या घटनात हरण व काळविटांची शिकार करतांना तीन संशयितांना ग्रामस्थांनी पकडून वन विभागाच्या ताब्यात दिल्याचे उघडकीस येणे, नांदगांव तालुक्यातील जामदरी शिवारात हरणाची शिकार करण्यासाठी आलेल्या दोघा संशयितांना स्थानिक ग्रामस्थांनी दि. ८ जुलै, २०१७ रोजी वा त्यासुमारास पकडणे, तर येवला तालुक्यातील राजापूर वन हद्दीतील कोळम येथे दि.१० जुन, २०१७ रोजी वा त्यासुमारास ममदापूर वन क्षेत्रात दिवसाढवळ्या बंदुकीच्या सहाय्याने नरकाळवीटाची शिकार केल्याचा प्रकार घडणे, नरकाळवीटला पोटात बंदूकीची गोळी लागल्याने जागीच गतप्राण होणे, शिकारीला प्रतिबंध करणाऱ्या स्थानिक मेंढपाळ तरुणांवर शिकाऱ्यांनी बंदुक रोखणे व पाचपैकी चौघांनी गाडीतून पलायन करणे, तरी मोठ्या शिताफीने जीव धोक्यात घालून एकास स्थानिक तरुणांनी पकडून ताब्यात घेणे, नाशिक जिल्ह्यात संरक्षित वन संवर्धन क्षेत्रात वन्य प्राण्यांचे शिकारीच्या घटना वाढूनही वनविभागाचे त्याकडे दुर्लक्ष होणे, जिल्ह्यात वनसंवर्धत क्षेत्रात हरिण, काळवीट, मोर व तत्सम वन्य प्राण्यांची संख्या मोठी असणे, मोठे माळरान असल्याने वन्य प्राण्यांनी पाणी पिण्यासाठी येणे, रात्री-अपरात्री या प्राण्यांची शिकार होणे, शिकारीसाठी सर्च लाईट, बंदुकीचा वापर शिकाऱ्यांकडून होणे, या पार्श्वभुमीवर वनविभाग व पोलिसांनी रात्रीची गस्त वाढवावी, अशी मागणी वन्य प्रेमींकडून केली जाणे, खात्याचा वचक नसल्यानेच शिकारीच्या प्रमाणात वाढ होणे, शासनाने याप्रकरणी गांभीर्यपुर्वक लक्ष देऊन वन्य जीवांचे संरक्षण करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. | **वने** |
| ७६ | सटाणा (जि.नाशिक) तालुक्यात डाळींब पिकावर तेल्या रोगाने थैमान घातल्याचे दिनांक ५ जुलै, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, हजारो हेक्टर वरील डाळींब बागा या रोगाच्या प्रादुर्भावामुळे नष्ट होण्याची बागायतदार शेतकऱ्यात भिती व्यक्त केली जाणे, तयार पिकांवर तेल्या रोगाचे आक्रमण झाल्याने होणाऱ्या हानीचे प्रमाण खुपच मोठे असल्याची शक्यता शेतकऱ्यांनी व्यक्त करणे, तेल्या रोगाच्या या थैमानामुळे बागायतदार शेतकऱ्यांमध्ये नैराश्याचे वातावरण पसरणे, कोणत्याही शेत मालाला भाव मिळत नसतांना हमीभाव देणारे व्यापारी पिक म्हणून अनेक शेतकऱ्यांनी डाळींबाची नव्याने लागवड केलेली असणे, तेल्या रोगाला तात्काळ अटकाव करण्याकरिता प्रतिबंधक औषधासह सत्वर उपाययोजना करण्याची मागणी होणे, तेल्या रोगाच्या प्रादुर्भावाचा प्रसार डाळींबाबरोबरच शेवगा, पपई, आंबा आदि पिकांवरही होऊ लागल्याने शेतकऱ्यात चिंतेचे वातावरण निर्माण होणे, शासनाने तातडीने दखल घेऊन उपाययोजना करण्याची गरज, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. | **कृषी** |
| ७७ | मौजे आंबिवली ता.अंधेरी येथील सर्व्हे नं.१४२ अ नभूक्र. ८३३ पै. मालती वसंत हाटे ट्रस्ट यांना नाममात्र १ रुपया वार्षिक भुईभाडे आकारुन शासनामार्फत दिलेली असणे, सदर संस्था चालकांनी मूळ एक अधिक अतिरिक्त चार असे एकूण पाच चटई क्षेत्र निर्देशांक वापरुन रुग्णालयाचे इमारतीचे बांधकाम केलेले असणे, सदर संस्थेस अर्णजित रक्कम १७४.८७ कोटी रुपये भरण्यास जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांनी आदेश पारीत केलेले असणे, सदर अर्णजित रक्कम वसूल करण्यास शासनाकडून दिरंगाई केली जात असणे,सदर रुग्णालयाचे बांधकाम करताना महानगरपालिकेने मंजूर केलेल्या नकाशा व्यतिरिक्त मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकाम केलेले असणे, यामुळे नागरीकांमध्ये तीव्र असंतोष मात्र त्याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कारवाई व प्रतिक्रिया. | **नगर विकास** |
| ७८ | कोट्यावधी रुपये घेऊन वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या करुन देणाऱ्या रॅकेटचा मुंबईच्या स्थानिक गुन्हे शाखेने माहे जून, २०१७ मध्ये पर्दाफाश करणे, सोलापूरचे पोलीस उपायुक्त नामदेव चव्हाण यांच्या तक्रारीवरुन स्थानिक गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांनी मुंबईच्या हॉटेल सहारा स्टार येथे धाड टाकल्यानंतर या रॅकेटचा पर्दा फाश होणे, या धाडीत रॅकेटमध्ये समावेश असलेल्यांना अटक होणे, त्यांच्याकडून कोट्यावधी रुपयांची रक्कम, महत्वाच्या | **गृह** |

| | | |
|---|---|---|
| | नोंदी सापडून येणे, या टोळीने आत्तापर्यंत अनेक पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्यांमध्ये हस्तक्षेप करुन पैशाच्या बदल्यात नियमबाह्य बदल्या केलेल्या असणे, सदर रॅकेटमध्ये पोलीस आयुक्त कार्यालय, पोलीस महासंचालक कार्यालय, मंत्रालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश असणे, या टोळीचा प्रमुख विद्यासागर हिरमुखे हा गृहराज्यमंत्र्यांच्या कार्यालयात एक वर्षापासून कार्यरत असणे, त्याच्याकडे अनेक महत्वाच्या नोंदी असणे, या रॅकेटमध्ये आयुक्त, महासंचालक व मंत्रालयातील उच्च पदस्थ अधिकाऱ्यांचा समावेश असल्याने पोलीसांवर या प्रकरणाचा तपास करतांना दबाव असणे, या दबावापोटी सदर प्रकरणी योग्य चौकशी होण्याची शक्यता नसणे, त्यामुळे या प्रकरणाचा तपास मा. उच्च न्यायालयाच्या विद्यमान न्यायमुर्ती किंवा निवृत्त न्यायमुर्तींच्या अध्यक्षतेखाली विशेष पथक स्थापन करुन करण्याची आवश्यकता, यासंदर्भात शासनाची भूमिका व करावयाची कार्यवाही. | |
| ७९ | वांद्रे (पूर्व ) येथील शासकीय वसाहतीची झालेली दयनीय अवस्था, शासकीय वसाहतीमध्ये एकूण ३७० इमारती असून त्यांचे सरासरी आर्युमान ४५ ते ५० वर्षाचे असणे, या शासकीय वसाहतीमधील ३७० पैकी ३६ इमारतीचे पुर्नबांधणीचे काम सन २०१४-१५ या अर्थसंकल्पात समाविष्ट असून त्याची अंदाजित किंमत रु १००.८४ कोटी इतकी असून तसेच उर्वरित ३३४ इमारतींची अंतर्गत व बाहय संरचनात्मक व नुतनीकरणाच्या दृष्टिने कामे हाती घेण्यात येणार असून त्याकरिता सन २०१३-१४ या वित्तीय वर्षात रु ३४.०४ कोटीची कामे करण्यात आल्याचे माहे माहे मार्च - एप्रिल,२०१७ मध्ये विधानपरिषदेत उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देतांना मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री महोंदयानी दिलेल्या लेखी उत्तरावरुन स्पष्ट होणे, परंतु प्रत्यक्षात २५ इमारतींचेही कामे सुरु असून अत्यंत धिम्म्यागतीने सुरु असणे, तर काही इमारतीची कामे अर्धवट अवस्थेत असणे, मा.सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांनी प्रत्यक्षात सदर वसाहतीची पाहणी करुनही अदयापी कोणतीच ठोस कार्यवाही झालेली नसणे, ठेकेदारांना वेळेत देयके मिळत नसल्याने इमारतीच्या उर्वरित कामांकरिता साहित्य आणण्यास होत असलेला विलंब,.वसाहतीची दयनीय अवस्था असतानाही इमारतीच्या दुरुस्तीकडे सबंधित अधिका-यांकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष होणे, वसाहतीतील इमारतीचे टप्प्याने दुरुस्तीचे काम हाती घेण्यात येत असणे, दरवर्षी हीच प्रक्रिया शासनाकडून होत असल्याने शासकिय कर्मचा-यांमध्ये पसरलेले नाराजी वातावरण, उक्त इमारती अतिशय दयनीय अवस्था झालेली असल्यामुळे त्या पाडून इमारतीच्या पुर्नबांधणीचे काम हाती घेण्याची नितांत आवश्यकता,याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी शासकीय कर्मचा-यांमध्ये पसरलेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने गांभीर्याने लक्ष घालून युध्दपातळीवर निर्णय घेण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका. | **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम)** |
| ८० | राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयीन पातळीवर स्वतंत्र प्रशासन नसल्याने अनेक शैक्षणिक अडचणी व गैरसोयींचा कनिष्ठ महाविद्यालय व विद्यार्थ्यांना सामना करावा लागणे, शासनाकडून समितीची स्थापना केली जाणे, यासाठी अभ्यास गटाची शिफारस असून देखील या विभागाच्या स्थापनेकडे शासनाचे दुर्लक्ष होणे, स्वतंत्र विभागाच्या स्थापनेच्या मागणीसाठी कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या संघटनांकडून गेल्या ३१ वर्षापासून लढा सुरु असणे, शासनाने वरिष्ठ महाविद्यालयास संलग्न कनिष्ठ महाविद्यालयांना माध्यमिक शाळा संहिता लागू करणे, मात्र स्वतंत्र विभागाचा प्रश्न प्रलंबितच असणे, स्वतंत्र विभागाची स्थापना व कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक-शिक्षकेतरांच्या अन्य मागण्यांप्रश्नी सत्वर निर्णय व्हावा, अशी मागणी असणे, राज्यात २ मे, २०१२ नंतर कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षक भरतीवर शासनाने बंदी घातलेली असणे, तरी गत साडेचार वर्षात कनिष्ठ महाविद्यालयात, सेवानिवृत्ती, अकाली निधन, स्वेच्छानिवृत्ती इत्यादी विविध कारणांनी मोठ्या संख्येने शिक्षकांची पदे रिक्त असणे, या रिक्त पदांवर शिक्षक भरतीसंबंधी शासन स्तरावरून धोरणात्मक निर्णय होत नाही, तोपर्यंत विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित विचारात घेता, कनिष्ठ महाविद्यालयातील रिक्त पदांवर तासिका तत्वांवर शिक्षकांची नियुक्ती करणे व त्यांना वेतन मानधन मंजुर करणेबाबत संबंधित कनिष्ठ महाविद्यालय व शिक्षक संघटनांकडून मागणी करण्यांत येणे तसेच केंद्राप्रमाणे सातवा वेतन आयोग लागू करावा, ऑनलाईन संचमान्यतेतील त्रुटी दुर कराव्यात, सन २००३ ते सन २०१० च्या सर्व वाढीव पदांना वेतन सुरु करावे, | **शालेय शिक्षण** |

| | | |
|---|---|---|
| | वैद्यकीय खर्चासाठी ‘कॅशलेस’ पध्दत सुरु करावी, चार वेळा मुल्यांकन करूनही ज्या कनिष्ठ महाविद्यालयांना अनुदान मिळालेले नाही, त्यांना त्वरीत अनुदान द्यावे, माहिती तंत्रज्ञान विषय अनुदानात समाविष्ट करावा, या व गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या विविध मागण्यांसाठी शिक्षकांनी वेळोवेळी आंदोलन करणे, गेल्या वर्षीही मुंबई आझाद मैदान येथे यामागण्यांसाठी आंदोलन केले जाणे, तरी, निर्णय न होणे, शासनाने कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या मागण्यांप्रश्नी तात्काळ कार्यवाही करून निर्णय घेण्याची आवश्यकता, शासनाचे प्रदिर्घ काळ याकडे झालेले दुर्लक्ष, त्यामुळे शिक्षकांत असलेले नाराजीचे वातावरण, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. | |
| ८१ | मालेगांव (जि.नाशिक) येथे शहरातील स्टेट बँक चौकात दिनांक २० जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास पोलिसांच्या विशेष पथकाने चलनातून बाद झालेल्या पाचशे रुपयाच्या ८३ लाख रूपयांच्या जुन्या नोटा जप्त करणे, याप्रकरणी सहा संशयितांना ताब्यात घेतले जाणे, ठराविक टक्केवारी घेऊन नोटा बदलून देणारी टोळी कार्यरत असल्याचा पोलिसांनी संशय व्यक्त करणे, याएकूण प्रकरणी सखोल चौकशीची जनतेकडून मागणी केली जाणे, नागरिकांकडील जुन्या नोटा बदलून देण्याची विहीत कायदेशिर मुदत संपुष्टात येऊनही ठिकठिकाणी मोठ्या रकमेच्या चलनातून बाद झालेल्या जुन्या नोटा मिळून येणे, त्यामुळे नेमक्या या नोटा कुठून येतात व त्यांचा विनियोग कशा पध्दतीने होतो, या टोळीचे काय मनसुबे आहेत, याबद्दल जनतेत आश्चर्य व्यक्त केले जाणे राज्यात देखील ठिकठिकाणी अशाच पध्दतीने चलनातून बाद झालेल्या नोटा मिळून येणे, शासनाने एकूणच याप्रकाराचा छडा लावावा, अशी मागणी करण्यांत येणे , याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया. | **गृह** |
| ८२ | मुंबईतील सायन - पनवेल महामार्गाच्या देखभाल दुरुस्तीच्या कामाची जबाबदारी सायन-पनवेल टोल्वेस या कंपनीकडे असतांनाही सदर कंपनीने दुरुस्तीचे काम योग्य न केल्याने या महामार्गावर झालेल्या एका अपघातात दोघांचा मृत्यु होण्याची घटना माहे जून, २०१७ मध्ये वा त्या सुमारास घडणे, सदर महामार्गावरील टोलमधून लहान वाहनांना सुट दिल्याने शासनाने कंपनीला १०३ कोटी रुपयांची नुकसान भरपाई, विलंबापोटी विलंब शुल्क देत असतांनाही कंपनीने देखभाल दुरुस्तीचे काम योग्य पध्दतीने न करणे, त्यामुळे शासनाने स्वतंत्र निविदा काढून रस्त्याच्या देखभालीसाठी मागील ३ वर्षात ६ कोटी व या वर्षी पुन्हा ३ कोटी रुपयांचा खर्च करणे, जबाबदारी असलेल्या कंपनीने दुरुस्तीचे काम योग्य न केल्याने होणारे अपघात व त्यातून होणारे नागरीकांचे होणारे मृत्यु, या मृत्युस जबाबदार धरुन कंपनीच्या संचालकांविरुध्द कारवाई करण्याची आवश्यकता, सदर रस्त्यावरील अवजड वाहनांची विशेष पथक व तंत्रज्ञानाव्दारे मोजणी करुन कंपनीस देण्यात येत असलेल्या भरपाईचा फेर आढावा घेण्याची, सदर रस्त्यावर मागील ३ वर्षात देखभाल दुरुस्तीसाठी झालेल्या खर्चाची कंपनीच्या नुकसान भरपाईतून वसूली करण्याची लोकप्रतिनिधींनी केलेली मागणी, देखभाल दुरुस्तीस हलगर्जीपणा केल्यामुळे कराराचा भंग होत असल्याने कंपनीचा करार रद्द करण्याची आवश्यकता, कंपनीच्या धोरणामुळे शासनाचे होणारे नुकसान व जनतेची होणारी जिवित व वित्त हाणी टाळण्यासाठी कंपनीवर तात्काळ कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. | **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम)** |
| ८३ | मैत्रेय कंपनी पाठोपाठ मैत्रेय सुवर्णसिध्दी कंपनीनेही नाशिक जिल्ह्यात अनेक गुंतवणुकदारांची कोट्यावधीची फसवणुक केल्याचे दिनांक : ७ जुलै, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, गुंतवणुकीची मुदत संपूनही पैसे मिळत नसल्याने गुंतवणुकदारांनी नाशिक पोलिस आयुक्तालयात धाव घेऊन कारवाईसाठी आंदोलन करणे, मैत्रेय सुवर्णसिध्दी कंपनीने नाशिक महानगरासह, मालेगांव, कळवण, देवळा, सटाणा, इगतपुरी व नाशिक जिल्ह्यात ठिकठिकाणी कार्यालये सुरु करणे, मैत्रेय कंपनीचे कार्यालय होते, त्याचठिकाणी मैत्रेय सुवर्णसिध्दी या नावाने नाशिक रोड येथे सदरील कंपनीने कामकाज सुरु केल्याचे निदर्शनास येणे, संबंधितांनी जिल्ह्यात दलाल-एजंटाच्या माध्यमातुन गुंतवणुकदारांना गुंतवलेली रक्कम व व्याजाच्या रकमेच्या मोबदल्यात सोने देण्याचे आमिष दाखविणे, गतवर्षी मैत्रेय कंपनीविरुध्द पोलिस कारवाई होणे, तरीही ‘‘मैत्रेय सुवर्णसिध्दी’’ या नाम साधर्म्य असलेल्या कंपनीने विविध | **गृह** |

| | | |
|---|---|---|
| | ठिकाणी गुंतवणुकदारांची फसवणुक करणे, फक्त सटाणा (जि.नाशिक) तालुक्यातील ५९४ ठेवीदारांची ३ कोटी रुपयांची सन २०१३ ते २०१६ या कालावधीत फसवणुक झाल्याची तक्रार सटाणा पोलिसात केली जाणे, या कंपनीच्या गुन्ह्याची व्याप्ती महाराष्ट्रात इतरत्र असल्याची माहिती उजेडात येणे, तरी कंपनीचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी गुंतवणूकीतील पैशासह पोबारा केल्याचे उघडकीस येणे, विविध गुंतवणुकीतुन चांगला मोबदला मिळेल, या अपेक्षेने गरीब, कष्टकरी नोकरदारांनी ठेवीच्या माध्यमातून गुंतवणुक करणे, मात्र मुदत संपल्यानंतर ठेवीदारांना कंपनीच्या कार्यालयाकडे संपर्क साधला असता ते बंद झाल्याचे लक्षात येणे, आकर्षक परताव्याचे आमिष दाखवून भाबड्या गोरगरीब, सर्वसामान्यांची फसवणुक करणाऱ्या गुंतवणुक कंपन्यांचे नाशिक जिल्ह्यात पेव फुटलेले असतांनाही पोलिस प्रशासनाकडून या फसव्या कंपन्यांविरुध्द वेळीच कारवाई न होणे, त्यामुळे जनतेची कोट्यावधीची फसवणुक होणे, जनतेत यामुळे प्रचंड संताप व नाराजीचे वातावरण असणे, पोलिसांनी तात्काळ मैत्रेय सुवर्णसिध्दीच्या गुन्हेगारांचा शोध घेऊन त्यांचेविरुध्द कारवाई करण्याची मागणी केली जाणे, तरी अद्याप कुठलीही कारवाई न होणे, याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया. | |
| ८४ | मुंबई - पुण्यानंतर नाशिक महानगराचे औद्योगिक, व्यावसायिक, कृषि, अर्थ, शैक्षणिक व तत्सम क्षेत्रातील वाढते महत्व विचारात घेता सुवर्ण त्रिकोणातील महत्वाचे व झपाट्याने विकसित झालेले व होत असलेले महानगराचे ठिकाण म्हणून नाशिक येथून प्रवाशी विमान वाहतुक सेवा लवकरात लवकर सुरू होण्याची आवश्यकता असणे, तरी मागील अनेक वर्षापासून नाशिककर विमान सेवेच्या प्रतिक्षेत असणे, नाशिक-ओझर येथिल विमानतळावर अशियाखंडातील सर्वात मोठी असलेली धावपट्टी, सर्व सोयीसुविधांनी युक्त असलेले पॅसेंजर टर्मिनल, व प्रशस्त इमारत तयार असून देखील याविमान तळावरून एक सुध्दा प्रवाशी विमानसेवा सुरु नसणे, विमान सेवा सुरु करण्यासाठी एच.ए.एल.कडे सर्व तांत्रिक मान्यता असणे, विमानतळासाठी लागणाऱ्या सर्व सोयीसुविधा उपलब्ध असूनही नाशिक येथून प्रवाशी विमान वाहतुक सेवा सुरु होत नसल्यामुळे नाशिककराची मोठी गैरसोय होणे, त्यांच्यात तीव्र नाराजी असणे, नाशिक ओझर येथून विमान सेवा सुरु झाल्यास नाशिकसह अहमदनगर, जळगांव, धुळे व नंदुरबार जिल्ह्यास होणारा फायदा तसेच मुंबई विमानतळाचा पार्किंग समस्येचा कमी होणारा ताण व त्यामुळे मोठ्या प्रमाणात होणारी आर्थिक बचत, इत्यादी बाबी विचारात घेता, नाशिक येथून प्रवाशी विमान वाहतुक सेवा सत्वर सुरु करण्याची गरज - आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. | **इतर कोणत्याही मंत्र्यांना विवक्षितपणे नेमून न दिलेले विषय** |
| ८५ | माहे मे २०१७ मध्ये मेळघाटातील संरक्षित वने आणि अतिसंरक्षित व्याघ्र प्रकल्पाच्या दोन हजार पाचशे हेक्टर जंगलामध्ये वणवा भडकल्याने जंगल बेचिराख झाले असणे, मेळघाटचे जंगल वन आणि व्याघ्र अशा दोन भागात असून पूर्व आणि पश्चिम मेळघाट वनविभाग संरक्षित तर सिपना , गुगामल आणि अकोट वन्यजीव विभागाचे जंगल अतिसंरक्षित असणे, आग विझवण्यासाठी बीटनिहाय वनमजूर नेमले असले तरी आदिवासींकडून विविध कारणांसाठी आगी लावण्यात येत असल्याची बाब पुढे आली असणे, दि.१५ फेब्रुवारी ते दि.१२ एप्रिल या दोन महिन्यात सिपना वन्यजीव विभागातील ८६९ हेक्टर तर गुगामल वन्यजीव विभागाचे ६५० हेक्टर जंगल आगीच्या भक्ष्यस्थानी पडले असणे,प्रादेशिक वनविभागाच्या पूर्व मेळघाट वनविभागाचे ६८८.४४ हेक्टर आणि पश्चिम मेळघाट वनविभागाचे सर्वात कमी २३० हेक्टर जंगल जळाल्याची नोंद असणे, ६० दिवसांत एकूण २५०० हेक्टर जंगलाची राखरांगोळी झाली असणे, दोन महिन्यापासून मेळघाटच्या जंगलात दररोज कुठे ना कुठे आगी लागत असल्याने सरपटणा-या प्राण्यांसह ससे , रानडुक्कर , हरीण , सांबर आदी वन्यप्राणी व वन्यपशु होरपळले असणे, यावर शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया . | **वने** |
| ८६ | देशभरात पोलिओ निमुर्लनासाठी सातत्याने मोहिम राबविण्यात येणे, अत्यंत सुक्ष्म मोहिम राबविल्याने देशभरात पोलिओचे निमुर्लन झाल्याचे दिसून येणे, त्याची जागतिकस्तरावर नोंदही घेतली जाणे, तरी, मालेगांव (जि.नाशिक) शहरात मात्र, पोलिओ विरोधातील लढाई अद्याप पुर्णपणे न संपणे, चुकीचे समज व प्रथामुळे शहरातील पुर्व भागातील अनेक कुटूंबाकडून बालकांना पोलिओ डोस देण्यास नकार दिला जाणे, याचा परिणाम पल्स पोलिओ मोहिमेवर होणे, | **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण** |

| | | |
|---|---|---|
| | यामुळेच दिनांक : २ जुलै, २०१७ रोजी मालेगांव महानगरपालिकेच्यावतीने राबविण्यात आलेल्या विशेष पल्स पोलिओ मोहिमेत मोठा निरूत्साह दिसून येणे, परिणामी, दिनांक : २ जुलै, २०१७ रोजीच्या विशेष अभियानात केवळ ४१ टक्के बालकांना पोलिओ डोस देण्यास आरोग्य यंत्रणेला यश येणे, या विशेष मोहिमेत १ लाख २५ हजार ७२५ बालकांना पोलिओ डोस मिळणे अपेक्षित असतांना, प्रत्यक्षात मात्र, ५२ हजार ५६८ बालकांपर्यंतच हे डोस पोहचणे, त्यामुळे आरोग्य यंत्रणेसमोर पोलिओ निमुर्लनाचे आव्हान उभे राहणे, यामोहिमेत मालेगांव (जि.नाशिक) शहर पिछाडीवर गेल्याचे स्पष्ट होणे, पोलिओ निमुर्लनांतर्गत पोलिओ लसीकरणाच्या विशेष मोहिमेसाठी मोठ्या प्रमाणावर नियोजन करूनही मोहिमेचे उद्दिष्ट निम्म्यापेक्षा कमी असणे, पोलिओ लसीकरणाबाबत मालेगांवातील जनतेत असलेले गैरसमज दुर करण्याच्या अनुषंगाने विशेष प्रयत्नांची आवश्यकता, सामाजिक स्तरावरून त्यासाठी केली जाणारी आग्रही मागणी, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. | |
| ८७ | सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या एसवायबीएच्या प्रश्नपत्रिकेत मराठी भाषेचे पाणीपत झाल्याचे प्रश्नपत्रिकेत दिसून आले असणे, मराठी भाषा ही वळवावी तशी वळते असे म्हटले जात असले तरी तिचा ठेका घेऊन ठेवलेल्या विद्यापीठाच्या प्रश्नपत्रिकेतच अक्षम्य अशा चुका होणार असतील तर मराठीजनांनी कुणाच्या तोंडाकडे पाहायचे असा सवाल उपस्थित होत असणे, प्रश्नपत्रिकेत अक्षम्य चुका असून सोपे व प्रचलित शब्द देखील अशुद्ध असणे, अत्यंत सोपे आणि प्रचलित शब्द चुकल्याचे निदर्शनास येणे, पानिपत ऐवजी 'पाणीपत' पानतावणे ऐवजी पानतापणे असे बरेचसे शब्द चुकीचे वापरण्यात आले असणे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विविध विषयांच्या लेखी परीक्षा सध्या घेतल्या जात असणे, एस.वाय बी.ए ची मराठी विषयाची प्रश्नपत्रिका पाहिली असता मराठी भाषेचे 'पानिपत' झाल्याचे दिसून आले असणे, सारांश लेखनाच्या उताऱ्यात मन:पूर्वक ऐवजी 'मन:पून',अफाट ऐवजी 'अकाट' पानिपतऐवजी 'पाणीपत', पानतावणे ऐवजी 'पानतापणे', दूरदृष्टीऐवजी 'दुरदृष्ट्या', नैराश्यऐवजी 'नेराश्य' व्यवहारऐवजी 'व्यावाहार' अशा 'नवीन' शब्दांची मेजवानी विद्यापीठाच्या मराठी विभागाने विद्यार्थ्यांना दिली असणे, याशिवाय आवश्यक तेथे विरामचिन्हांचा वापर प्रश्नपत्रिकेत करण्यात आला नसल्याचेही दिसून आले असणे, याच विषयाच्या बहिर्गत विद्यार्थ्यांसाठी असलेल्या दुसऱ्या प्रश्नपत्रिकेतही अशाच काही चुका झाल्याचे दिसून आले असणे, वीसऐवजी 'बीस',न्यूयॉर्कऐवजी 'न्यूयार्क' अशा चुका झाल्या असणे,विद्यापीठांमध्ये तज्ञ व्यक्ती असूनही प्रश्नपत्रिकेत चूक झाल्यामुळे विद्यार्थी व पालकांमध्ये संभ्रम व चिडीची भावना निर्माण झाली असणे, सदर गंभीर प्रकरणी जबाबदारी निश्चित करुन कार्यवाही करण्यासाठी शासनाची प्रतिक्रिया . | **उच्च व तंत्र शिक्षण** |
| ८८ | बांधकाम व घरेलू कामगारांची नोंदणी करून त्यांना कल्याणकारी योजनांचा लाभ देण्यासाठी सर्व जिल्ह्यांसाठी स्वतंत्र मनुष्यबळाची नेमणुक करून जिल्हास्तरावर कार्यालये निर्माण करण्यासाठी लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केलेली असणे, मात्र दुसरीकडे बांधकाम कामगार कल्याण मंडळाकडे ४००० कोटींहून अधिक रुपयांचा निधी नियोजनाच्या अभावामुळे पडून असल्याचे निदर्शनास येणे, घरेलु कामगारांच्या अनेक मागण्यांसाठी मुंबईतील घरेलु कामगार महिलांनी आपल्या प्रलंबित मागण्यांकरीता दिनांक १६ जून, २०१७ रोजी जागतिक घरेलु कामगार दिनानिमित्त मुक मोर्चा काढणे, तसेच दहिसर विभागात केतकीपाडा, रावळपाडा, दामुनगर, भीमनगर, याठिकाणी घरकाम करणा-या महिलांची संख्या मोठया प्रमाणात असणे, राज्यात सुमारे वीस लाख बांधकाम कामगार असूनही शासनामार्फत त्यातील केवळ तीन लाख पन्नास हजार कामगारांचीच नोंदणी पुर्ण झालेली असणे,नोंदी असलेल्या कामगारांच्या पाच टक्क्यांपेक्षाही कमी लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळालेला असणे,कामगारांची नोंदणी करण्यासाठी व त्यांना कल्याणकारी योजनांचा लाभ देण्यासाठी सर्व जिल्ह्यांसाठी स्वतंत्र मनुष्यबळाची नेमणुक करून जिल्हास्तर कार्यालये निर्माण करण्याची आवश्यकता,बांधकाम कामगारांच्या कल्याणाबाबत राज्य शासन उदासिन असल्याचे दिसुन येत असल्यामुळे राज्यातील असंघटित क्षेत्रातील कामगारांमध्ये निर्माण झालेला प्रचंड असंतोष,त्यामुळे शासनाने बांधकाम कामगार कल्याण मंडळाकडील योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याची गरज असणे, तसेच उपलब्ध | **कामगार** |

| | | |
|---|---|---|
| | निधीमधून कामगारांच्या पाल्यांसाठी शैक्षणिक सुविधा,वैद्यकीय मदत,कामगारांचे कौशल्य विकसित करण्यासाठी विभागीयस्तरावर कौशल्य विकास ॲकेडमी,निवास व्यवस्था,बोनस व निवृत्तीवेतन इ.नवीन कल्याणकारी योजना राबविण्यासाठी तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, यावर शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. | |
| ८९ | जैतापूर प्रकल्प हद्दपार होणारच अशी राज्याच्या पर्यावरण मंत्र्यांनी भूमिका घेतलेली असल्याने सदर प्रकल्पाबाबत राज्य शासनाची भूमिका स्पष्ट नसल्याने या प्रकल्पाच्या भवितव्याबाबत प्रश्न निर्माण झालेला असणे , राज्याच्या नव्हे तर देशाच्या विकासाला चालना देणाऱ्या अणुउर्जा प्रकल्पाबाबत राज्य सरकारमध्येच मतभेद असल्यामुळे या प्रकल्पाबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झालेले असणे , अणुउर्जा निर्मिती करून देशात उर्जा निर्मितीबाबत महाराष्ट्र राज्य हे विकासाचे पाऊल टाकत असतांना सरकारमधील घटकपक्षाच्या विरोधामुळे या प्रकल्पाबाबत संभ्रम निर्माण होणे , वास्तविक सदर प्रकल्पास केंद्र व राज्य सरकारची मंजुरी असून हा प्रकल्प सुरु करण्यासाठी केंद्र शासन आग्रही असणे , जागतिक पातळीवरील या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासंदर्भात शासनाच्या दुटप्पी भूमिकेमुळे जनतेमध्ये पसरलेली तीव्र संभ्रमाची भावना , त्यामुळे जैतापूर अणुउर्जा प्रकल्पाबाबत राज्य शासनाने नेमकी भूमिका स्पष्ट करून प्रकल्पाला गती देण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया. | **ऊर्जा** |
| ९० | जेनेरिक औषधांची सक्ती रुग्णांच्या जीवाशी खेळणे ठरेल असे माहे मे २०१७ मध्ये काही तज्ज्ञांनी निदर्शनास आणून दिल्यामुळे जेनेरिक औषधांच्याबाबत नागरिकांमध्ये प्रचंड संभ्रम निर्माण झालेला असणे,जेनेरिक औषधांचा दर्जा वेळोवेळी तपासला गेला नाही तर ही औषधे रुग्णांच्या जीवावर बेतणार असणे,सर्व औषधांची तपासणी करण्याची एफडीएची क्षमता नसणे, देशातील काही राज्यांमध्ये लघुउद्योगात औषधांची निर्मिती होत असल्याने महाराष्ट्रात येणारी सर्व औषधे तपासून त्यांचा दर्जा नियंत्रणात ठेवणे अशक्य असणे,अशावेळी जेनेरिक औषधांच्या नावाने राज्यात नकली व निष्कृष्ट दर्जाचे औषधे वितरीत होत असल्यामुळे रुग्णांच्या जीवाला निर्माण झालेला धोका, यावर शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. | **अन्न व औषध प्रशासन** |
| ९१ | महाराष्ट्रातील प्राणहिता , गोदावरी व पैनगंगा या नद्यांवरील तुमडीहेटी , मेडिगट्टा आणि चनाखा—कोर्टा असे तीन बंधारे बांधण्यासाठी महाराष्ट्र आणि तेलंगणा यांच्यात माहे ऑगष्ट, २०१६ मध्ये सामंजस्य करार झालेला असणे, महाराष्ट्र-तेलंगाणा कराराने निम्न पैनगंगा प्रकल्पाबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झालेले असणे, निम्न पैनगंगा धरणाचे ८८ टक्के पाणी महाराष्ट्राला आणि १२ टक्के पाणी तेलंगणाला मिळणार असणे, मात्र महाराष्ट्र तेलंगणा सामंजस्य करारामुळे निम्न पैनगंगाचे स्वप्न साकार होणे अशक्य असल्याची स्थानिक लोकप्रतिनिधींची भावना असणे, गोदावरी पाणी तंटा लवादानुसार प्रस्थावीत धरण स्थळापर्यंतचे पैनगंगा नदीचे संपूर्ण पाणी महाराष्ट्र राज्याचे आंतरराष्ट्रीय प्रकल्प बांधून वापरायचे असणे, त्यानुसार ११६४ दलघमी (४१ टी.एम.सी.) पाणी वापरावयास मिळणार असणे,त्या करिता सध्या प्रस्थावित केलेले धरणस्थळ भोगोलिक व अभियांत्रिकी दृठ्या योग्य स्थळ असून केवळ २ किमी लांबीचे धरण या ठिकाणी बांधण्यामुळे उपरोक्त पाणी वापर शक्य होणार असणे, या आंतरराष्ट्रीय बहुउद्देशीय प्रकल्पामुळे महाराष्ट्राच्या यवतमाळ व चंद्रपूर तसेच तेलगांना राज्याच्या आदिलाबाद जिल्ह्यातील मागासवर्गीय व नक्षलग्रस्त क्षेत्रास सिंचनाचा लाभ होणार असणे, या करारानंतर गडचिरोली जिल्ह्यात तीव्र प्रतिक्रिया उमटलेल्या असणे, राज्य शासनाने गडचिरोली जिल्ह्याचे हित लक्षात न घेता एकतर्फी निर्णय घेतल्याचा लोकप्रतिनिधींचा आरोप असणे, महाराष्ट्र आणि तेलंगणा या दोन राज्यांमध्ये झालेल्या सिंचन कराराला जलसंपदा राज्यमंत्री यांनी आक्षेप घेतला असणे, कृष्णा खोऱ्यातील ८१ टीएमसी पाणी महाराष्ट्राने घेण्यावर आक्षेप नोंदवत तेलंगणा सरकारने यापूर्वीच मा.सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केलेली असणे , जोपर्यंत हा आक्षेप मागे घेतला जात नाही तोपर्यंत गोदावरी पाणीवाटप करार करू नये अशी मागणी राज्याचे जलसंपदा राज्यमंत्री यांनी केलेली असणे, मात्र तरीही महाराष्ट्र तेलंगणा आंतरराज्य मंडळाच्या झालेल्या बैठकीत तुमडीहेटी , मेडिगट्टा आणि चनाखा —कोर्टा बॅरेज या तीन बॅरेजचे काम सुरु करण्यासाठी दोन्ही राज्यांमध्ये | **जलसंपदा** |

| | | |
|---|---|---|
| | सामंजस्य करार करण्यात आले असणे, मा.मुख्यमं-यांनी करार करतांना महाराष्ट्राच्या हिताच्या मुद्यांकडे दुर्लक्ष केल्यामुळे तेलंगणाचे नाक दाबण्याची संधी गमावल्याची टीकाही जलसंपदा राज्यमंत्री यांनी केलेली असणे, त्यामुळे येथील स्थानिक नागरिकांमध्ये निर्माण झालेले प्रचंड संतापाचे वातावरण, यावर शासनामार्फत तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. | |
| ९२ | दि १९ जून, २०१७ रोजी संगिता विलास मोकळ रा. सिन्नर जि.नाशिक या महिलेची राहत्या घरात हत्या केल्याचे निदर्शनास आले असणे, स्व.संगिता विलास मोकळ यांचे भाऊ श्री जनार्दन दत्तात्रय खंडीझोड हे सिन्नर पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करण्यासाठी गेले असता पोलिसांनी आत्महत्येचा गुन्हा दाखल करण्याचा प्रयत्न केला असणे, सदर प्रकरणामध्ये पोलिसांनी खुनाचे पुरावे नष्ट करुन आरोपींना मदत केल्याबाबत खंडीझोड यांची तक्रार असणे, मयत महिलेचे शिक्षक पती श्री.विलास शंकर मोकळ , श्री चंद्रभागा शंकर मोकळ (सासू) आणि श्री.रविंद्र वामन भालेराव (पतीचे मामा) या तिघांनी संगनमताने तीक्ष्ण हत्यारांनी हा खून केल्याबाबत नातेवाईकांची तक्रार केलेली असणे, सदर घटनेमुळे सिन्नर तालुक्यामध्ये महिलांसाठी भीती निर्माण झालेली असणे, त्यामुळे आरोपींना कठोरात कठोर शिक्षा होणे आवश्यक असणे, मात्र सिन्नर पोलिसांकडून आरोपींना सहकार्य केले जात असणे, त्यामुळे या संपूर्ण घटनेची सी. आय. डी. मार्फत चौकशी करणेची मागणी असणे, यावर शासनामार्फत करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. | **गृह** |
| ९३ | मुंबई पालिकेने शहरातील ६१७ धोकादायक इमारतीची यादी जाहिर करणे, यात कुर्ला विभागात सर्वाधिक १११ इमारती असून यात खासगीसह महापालिका व राज्य शासनाच्या इमारतींचा समावेश असणे, पावसाळयापूर्वी धोकादायक इमारतींसह दरड कोसळण्याचा धोका असलेल्या वस्त्यांना बजावण्यात आलेल्या नोटिसा, खासगी इमारतीमधील रहिवाशी इमारत रिकामी करण्यास तयार नसणे, धोकादायक इमारतीतील रहिवाश्यांची पर्यायी व्यवस्था तात्काळ करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिकिया व भूमिका. | **नगर विकास** |
| ९४ | नाशिक संदर्भ सेवा रुग्णालयातील मूत्रपिंड प्रत्यारोपण विभाग कागदोपत्रीच चालू असणे,मुत्रपिंड प्रत्यारोपणासाठी मान्यता मिळालेली असूनही यासाठी आवश्यक नेफ्रॉलॉजिस्ट, तंत्रज्ञ, आवश्यक मनुष्यबळ आणि यंत्रसामुग्रीची पूर्तता झालेली नसणे,डायलीसीससाठी दरदिवशी २० रुपयांची प्रतीक्षा यादी असणे, तीन सत्रात डायलीसीस करण्यासाठी रुग्णालयास १० डायलीसीस यंत्र व डायलीसीस खुर्च्यांची तसेच आवश्यक मनुष्यबळाची निकड असणे,देखभाल दुरुस्तीसाठी निधीची तरतूद नसल्यामुळे रुग्णालयातील वातानुकीलीत यंत्रणा व लिफ्ट वर्षभरापासून बंद असल्यामुळे सदर रुग्णालय मृत्यूशय्येवर असणे, अमरावतीच्या संदर्भसेवा रूग्णालयाप्रमाणे नाशिक संदर्भ सेवा रुग्णालयामध्ये प्लास्टीक सर्जरी, न्युरोलॉजी आणि पेडियाट्रिकसह इ. विकारांवरील विभाग सुरु करण्यासाठी येथे दोन मजले वाढवून २०० बेडचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असणे, रुग्णालयातील यंत्रणा व देखभाल दुरुस्तीच्या समस्येबरोबरच मंजुर आकृतीबंधाप्रमाणे ३६७ पदांपैकी ९२ पदे रिक्त असल्यामुळे रुग्णांचे प्रचंड हाल सुरु असणे, असाध्य व दुर्धर आजारांच्या निदान व उपचारांसाठी सर्वसामान्यांच्या दृष्टीने संजीवनी ठरलेल्या नाशिकच्या विभागीय संदर्भसेवा रुग्णालयात महात्मा फुले जीवनदायी आरोग्य वीमा योजनेअंतर्गत उपचारासाठी रुग्णांना तीन - तीन महिन्यांची प्रतिक्षा करावी लागत असल्याचे निदर्शनास येणे, या रुग्णालयातील अतिविशेषोपचार तज्ञ,वैद्यकीय अधिकारी, परिचारिका इत्यादी शेकडो पदे रिक्त असणे, तसेच सुधारित आकृतीबंधाचा प्रस्ताव शासनस्तरावर प्रलंबित असणे, येथील कामाचा व्याप लक्षात घेता आकृतीबंधाव्यतिरिक्त अतिरिक्त स्वरुपात वैद्यकीय व शुश्रुषा संवर्गातील परिचारिकांची पदे नव्याने निर्माण करून सदर पदे भरण्याबाबत विभागीय उपसंचालकांनी शासनाकडे पाठविलेला प्रस्ताव प्रलंबित असणे,वाढत्या रुग्णसंख्येमुळे या रुग्णालयाचे २०० बेडमध्ये रुपांतर करण्याचा प्रस्ताव असणे, सदर विभागीय संदर्भसेवा रुग्णालयामध्ये शासकीय वैद्यकीय पदव्युत्तर महाविद्यालय सुरु करण्याचा प्रस्ताव शासनाच्या लालफितीत अडकलेला | **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण** |

| | | |
|---|---|---|
| | असणे, त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण व चिडीची भावना, याबाबत शासनामार्फत तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. | |
| ९५ | राज्यातील विमुक्त जाती , भटक्या जमाती व इतर मागासवर्गातील अभियांत्रिकीसह तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील महाविद्यालयांमध्ये शिकणाऱ्या सुमारे सव्वा दोन लाख विद्यार्थ्यांना शासनाकडून दरवर्षी शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती देणे आवश्यक असणे, मात्र सदर शिष्यवृत्ती /शैक्षणिक शुल्क प्रतीपुर्तीच्या अंमलबजावणीत वर्षानुवर्षे दिरंगाई केली जात असणे, पुरेशा अनुदानामुळे अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे सन २०१५-१६ चे अंशतः आणि सन २०१६-१७ चे संपूर्ण शुल्क अद्याप प्रलंबित असणे, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती प्रलंबित असल्यामुळे अभियांत्रिकी शिक्षणाचा दर्जा घसरला जाणे, शासनाकडून अर्थसंकल्पामध्ये शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्तीसाठी पुरेशी तरतूद केली जात नसणे,तसेच तरतूद केलेल्या निधीचा सुद्धा यंत्रणांच्या दिरंगाईमुळे विनियोग न केला जाणे, सदर योजनेतील दिरंगाईबाबत शासनाने सखोल चौकशी करुन संबधितांवर जबाबदारी निश्चित करण्याची आवश्यकता असणे, प्रलंबित शुल्कांमुळे विद्यार्थी व पालकांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झालेले असणे, यावर शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया. | **सामाजिक न्याय** |
| ९६ | राज्य पोलीस दलाच्या शस्त्र शाखेतील सुमारे ९० टक्के शास्त्रांचे आयुर्मान संपलेले असल्याची धक्कादायक माहिती निदर्शनास येणे, ही शस्त्रे पुन्हा कर्तव्यासाठी वापरायची असतील तर "इलेक्ट्रीकल – मॅकेनिकल असि. इंजिनिअर ऑफ स्मॉल आर्मस" या दर्जाच्या तज्ञांकडून प्रमाणित करणे आवश्यक असणे, मात्र सन १९९६ पासून लाखो शस्त्रे प्रमाणित झालेली नसणे, मुंबईवर २६/११ चा दहशतवादी हल्ला झाल्यानंतर पोलीस दलाकडे असलेली शस्त्रे व त्यांच्या गुणवत्तेचा प्रश्न ऐरणीवर येणे, त्यानंतर केवळ पोलीस दल आधुनिकीकरणाच्या चर्चा होणे, मात्र पोलिसांच्या शस्त्रसाठ्याच्या गुणवत्तेत फरक पडलेला नसणे, यावर शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया. | **गृह** |
| ९७ | नंदूरबार जिल्हयातील तळोदा येथे दि.४ जुलै, २०१७ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे पूर्ण तालुक्यासह शहराला मोठा तडाखा बसला असून या अतिवृष्टीत पशुधनासह मालमत्तेची मोठी हानी होणे, तळोदा तालुक्यात नैसर्गिक आपत्तीने कहर करणे, त्यामुळे हजारो कुटूंबिय रस्त्यावर आले असून अनेकांचे रस्त वाहून जाणे, खर्डी नदीला पूर आल्याने परिसरातील नालेही ओसंडून वाहत असणे, सद्‌गव्हाण पुलाचे बांधकाम सुरु असल्याने पाणी वर आल्यामुळे नंदूरबार शहराकडे जाणारे मार्ग बंद होणे, दरम्यान खर्डी नदी पुराचे पाणी तळोदा शहरातील वसाहतींमध्ये शिरल्याने घरांची पडझड होऊन अनेक जण जखमी होणे, या अतिवृष्टीत कापूस, पपई, ऊस अशी अनेक पिके पाण्यात वाहून गेल्याने शेतीचे मोठे नुकसान होणे, तसेच सरदार सरोवर प्रकल्प बाधितांची पुनर्वसन केलेली वसाहतही अतिवृष्टीमुळे पूर्णपणे पाण्यात जाणे, त्यामुळे तळोदा तालुक्यातील शेकडो कुटूंबे नेस्तनाबूत झाली असून या अतिवृष्टीत नुकसान झालेल्या कुटूंबाना आर्थिक व अन्य स्वरुपाची मदत त्वरीत देऊन या बाधित झालेल्या कुटूंबाचे पुनर्वसन करण्यासाठी करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया. | **मदत व पुनर्वसन** |
| ९८ | राज्यातील सामाजिक न्याय विभागाअंतर्गत कार्यरत असलेल्या शासकीय वसतीगृहांतील विद्यार्थ्यांना आंघोळीसाठी गरम पाणी मिळणे या उद्देशाने सन २०११-१२ मध्ये ७३३ सोलर वॉटर हिटर बसविण्यात आलेले असणे,सदर सोलर वॉटर हिटरच्या तसेच बायोमेट्रीक यंत्रणा बसविणाऱ्या पुरवठादारांकडून अटी - शर्तीप्रमाणे कार्यवाही न केली जाणे,सदर संयत्र निष्कृष्ट साहित्याचे असल्याने राज्यात बहुतांश ठिकाणी महिना दोन महिन्यातच ते नादुरुस्त झालेले असणे, रश्मी इंडस्ट्रीज बंगलोर या पुरवठादारास माहे जानेवारी २०१६ मध्ये फक्त कारणे दाखवा नोटीस दिलेली असणे, मात्र | **सामाजिक न्याय** |

| | | |
|---|---|---|
| | पुरवठादारांकडून कारवाई करण्याकरिता जाणूनबुजून टाळाटाळ केली जात असणे, सदर सयंत्र निकृष्ट साहित्याचे असल्याने राज्यात बहुतांश ठिकाणी महिना दोन महिन्यातच ते नादुरुस्त झालेले असणे, या संयंत्रांची पुरवठ्याच्या दिनांकापासून पाच वर्षे मोफत देखभाल दुरुस्ती करणे बंधनकारक असतांनाही पुरवठादार व प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे व हलगर्जीपणामुळे ५० टक्क्याहून अधिक आश्रमशाळांमधील सोलर वॉटर हिटर अनेक वर्षांपासून बंद स्थितीत असणे, केवळ प्रशासनाच्या बेफिकीर कारभारामुळे कोट्यावधी रुपयांचा खर्च करूनही ऐन थंडीत विद्यार्थ्यांवर गार पाण्याने आंघोळ करण्याची वेळ येणे, त्यामुळे निष्कृष्ट वॉटर हिटर बसविणाऱ्या तसेच देखभाल दुरुस्ती न करणाऱ्या ठेकेदारांवर तसेच अटीशर्तीचे उल्लंघन करूनही पुरवठादारकांचे देयके अदा करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची आवश्यकता, शासकीय आश्रमशाळा व वसतीगृहामधील नादुरुस्त वॉटर हिटर व बायोमेट्रिक यंत्रणा कार्यान्वीत करण्यासाठी शासनामार्फत उपाययोजना करण्याची आवश्यकता,मात्र याबाबत शासनाकडून कोणतीही कार्यवाही केली जात नसल्यामुळे विद्यार्थी व कुटुंबियांमध्ये निर्माण झालेले संतापाचे वातावरण, यावर शासनाने तातडीने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. | |
| ९९ | सन २०१२ च्या दिल्लीतील निर्भया बलात्कार व हत्याकांडाच्या घटनेनंतर तत्कालीन गृहमंत्र्यांनी देशभरात महिलांसाठी महिलांनी चालवलेली पोलीस ठाणी सुरु करण्याची घोषणा केलेली असणे, मात्र याची अंमलबजावणी करण्यात पुरोगामी महाराष्ट्र अपयशी ठरले असणे, देशभरात एकूण ५३५ महिलांसाठीची पोलीस ठाणी असतांना महाराष्ट्रात असे एकही ठाणे सुरु झाले नसणे , स्वतंत्र महिला पोलीस ठाणे नसलेल्या २९ पैकी छोट्या राज्यात मोठ्या महाराष्ट्राचा समावेश असणे , दिल्लीतील २०१२ मधील निर्भया घटनेनंतरच खास महिलांची पोलीस ठाणी सुरु करण्याच्या हालचालींना सुरुवात झाली असणे, तत्कालीन केंद्रीय गृहमंत्री यांनी सर्व राज्यांना ॲडव्हायजरी जारी करुन एका जिल्ह्यात किमान एक स्वतंत्र महिला पोलीस ठाणे सुरु करण्याची सूचना केलेली असणे , तसेच प्रत्येक पोलीस ठाण्यात महिला व बालकांसाठी खास डेस्क सुरु करण्याची सूचना करण्यात आली असणे, मात्र महाराष्ट्र राज्यामध्ये एकही महिला पोलीस ठाणे सुरु झालेले नसणे, याबाबत शासनामार्फत तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. | **गृह** |
| १०० | अनु.जाती, अनु.जमाती , इमाव , अल्पसंख्यांक तसेच भटक्या विमुक्त समाजाला स्वयंरोजगारासाठी तसेच उच्च शिक्षणासाठी अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ , महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ , लोकशाहीर आण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळ , स्व.वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती महामंडळ , अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ तसेच संत रोहिदास चार्मोद्योग विकास महामंडळ तसेच इतर आर्थिक महामंडळामधील योजना ठप्प झाल्यामुळे लाभार्थी युवकांना वर्षानुवर्षे प्रतीक्षा करावी लागत असणे , गरीब घटकातील बेरोजगारांना सुलभ व्याजदराने अर्थसहाय्य मिळवून देणाऱ्या या महामंडळांची अवस्था अत्यंत हालाखीची झालेली असणे, पुरेशा अनुदानाची तरतूद व अपुऱ्या भागभांडवलामुळे लाभाच्या सर्व योजना ठप्प झालेल्या असणे, केवळ निधी अभावी या महामंडळामार्फत सध्या कोणत्याही योजना राबविल्या जात नसणे, गेल्या वर्षभरापासून बंद पडलेल्या योजना पूर्ववत सुरु करण्यासाठी या महामंडळाना भरीव निधी उपलब्ध करून देण्याकरिता शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया | **वित्त** |
| १०१ | खोटे प्रतिज्ञापत्र व कागदपत्राद्वारे गृहनिर्माण सोसायटीची स्थापना करâन शासन व म्हाडाची सुमारे ४० कोटीची फसवणूक केल्याप्रकरणी चें◌ंबूर येथील टिळकनगर पोलिस ठाण्यात सोसायटीच्या माजी पदाधिका-यासह सहा जणांविरुध्द गुन्हे दाखल होणे, यामध्ये एका सहायक पोलिस आयुक्त, माजी पोलीस निरिक्षक , आणि प्रत्येकी दोन हवालदार व बांधकाम व्यावसायिकांचा समोवश असणे, शासन व म्हाडाच्या २० टक्के घरांची परस्पर विकी करâन अपहार करणे, खोटे कागदपत्रे तयार करâन शासन व म्हाडाची फसवणूक करण्याच्या प्रकरणात दिवसेंदिवस होत असलेली वाढ, उपरोक्त प्रकरणी दोषी असणा- | **गृहनिर्माण** |

| | | |
|---|---|---|
| | या कडक कारवाई होण्याची नितांत आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने सखोल चौकशी करुन शासन स्तरावर करावयाची कार्यवाही , व याबाबत शासनाची प्रतिकिया व भूमिका . | |
| **१०२** | मीरा-भाईदर शहरासाठी सुरक्षा केलेल्या सुमारे ४९५ कोटी रुपयांच्या भुयारी गटार योजनेतील पाईप पुरवठयातील देयकांमध्ये घोटाळा झाल्याचे नुकतेच माहे जून,२०१७ मध्ये उघडकीस येणे, नागरिकांना मुलभूत सुविधा प्राप्त व्हावी यासाठी महापालिकेतर्फे भुयारी गटार योजनेचे काम गेल्या पाच वर्षापूर्वी सुरक्षा होणे, सदर कामाचा ठेका मे.सुभाष प्रोजेक्ट अॅड मार्केटिग कंपनीला देण्यात येणे, सदर कामामध्ये ९०० मि मी पाईपप्रकरणीही देयक कमांक ४५ मध्ये सुमारे २० लाख ३० हजार ९३४ रुपयांची हेराफेरी झाल्याचे निदर्शनास येणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, सदर प्रकरणी सखोल चौकशी होण्याची नितांत आवश्यकता, यात दोषी असणा-या व्यक्तीवर कडक कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका . | **नगर विकास** |
| **१०३** | राज्याच्या शिक्षण आयुक्तांकडून लागू करण्यात आलेल्या निर्णयामुळे पहिली ते आठवीच्या विषयावर तासिकांच्या नियोजनात कला व क्रिडा शिक्षकांच्या तासिका कमी केल्या असल्याचे माहे मे-२०१७ दरम्यान निदर्शनास येणे, शिक्षण आयुक्तांनी अचानक २८ एप्रिल, २०१७ रोजी परिपत्रक काढून विषयवार तासिका वाटपात अनावश्यक बदल केला असणे, त्यानुसार कला व क्रिडा शिक्षकांचा भारांश ८ टक्कयाऐवजी ४ टक्के करुन आवडयाला चार तासिकांऐवजी अवघ्या २ तासिका दिल्या असणे, ही बाब क्रिडा व कला विषयावर अन्याय करणारी असणे, शासनाच्या या निर्णयाविरोधात या शिक्षकांनी आंदोलने केली असतानाही शासन करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी या शिक्षकांत पसरलेले असंतोषाचे वातावरण त्यामुळे शासनाने पूर्वी प्रमाणेच कला व क्रिडा शिक्षकांना आठवडयाला चार तासिका देण्याबाबत करावयाची कार्यवाही व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रीया. | **शालेय शिक्षण** |
| | ******** | |